मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले




● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : २०८ ■ बुधवार, ०८ एप्रिल २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514



**भाजपा स्थापना दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री "मा. देवेंद्र जी फडणवीस "यांच्या निवासस्थानी भाजपा युवा मोर्चाच्या वतीने भाजपा ध्वज प्रदान करण्यात आला व ध्वज फडकवण्यात आला या वेळी भाजप महानगर अध्यक्ष दयाशंकर तिवारी, महामंत्री श्रीकांत आगलावे, रितेश गांवडे,विष्णु चांगदे नगरसेवक श्री विरेन्द्र कुकरेजा,युवा मोर्चा अध्यक्ष सचिन करारे,महामंत्री रितेश पांडे,रिषभ अरखेल व युवा मोर्चाच्या सर्व कार्यकर्त्यांच्या उत्स्फूर्त उपस्थितीत कार्यक्रम उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला.( दैनिक युवक आधार )**

# मेट्रो लाईन-९चा पहिला टप्पा सुरू

## मुंबई-मीरा-भाईंदर प्रवास जलद -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई :** दहिसर पूर्व ते काशीगाव या ४.७ किलोमीटर लांबीच्या मार्गिकेवर चार स्थानकांसह आजपासून मेट्रो सेवा सुरू झाली आहे. यामुळे मुंबई आणि मीरा-भाईंदर हा प्रवास जलद होणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मेट्रो लाईन-९ च्या पहिल्या टप्प्याचे उद्घाटन करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते.



यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, मुंबई उपनगर पालकमंत्री ॲड. आशिष शेलार, बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या महापौर रितू तावडे, आमदार प्रवीण दरेकर, आमदार संजय उपाध्याय, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणचे आयुक्त डॉ. संजय मुखर्जी आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, या टप्प्यात दहिसर पूर्व, पांडुरंगवाडी, मीरागाव आणि काशीगाव अशी स्थानके असून, ही मेट्रो लाईन-७ शी जोडली गेल्याने प्रवाशांना अधिक चांगली संलग्नता मिळणार आहे. दुसऱ्या टप्प्यात साईबाबा नगर ते सुभाषचंद्र बोस मैदान या मार्गाचे काम ९६ टक्के पूर्ण झाले असून, याच वर्षात त्याचेही उद्घाटन करण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. सुमारे ६,६०७ कोटी रुपये खर्चाच्या या प्रकल्पामुळे सध्या एक ते दोन तास लागणारा प्रवास केवळ ३० मिनिटांत पूर्ण होणार आहे. पुढील टप्प्यांमध्ये ही मेट्रो लाईन-३ शी जोडली जाणार असून, मीरा भाईंदर ते कुलाबा दरम्यान सीमलेस प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे.मेट्रो सेवेत कॅशलेस व्यवहाराला प्राधान्य देण्यात आले असून, सध्या ८० टक्के तिकीट व्यवहार डिजिटल पद्धतीने होत आहेत. स्मार्ट कार्ड आणि 'वन कार्ड' प्रणालीमुळे एकात्मिक वाहतूक व्यवस्थेला चालना मिळत आहे.

# शिवतेजाचा जागर! 'मोठे भोम' येथे 'सिंह गर्जला रणी' नाटकाला रसिकांचा उदंड प्रतिसाद!

## स्थानिक कलाकारांनी उभा केला जिवंत इतिहास!

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी :** सह्याद्रीच्या कड्याकपाऱ्यांतील पराक्रमाचा इतिहास आणि शिवरायांच्या जाज्वल्य स्मृतींना उजाळा देणारे 'सिंह गर्जला रणी' (लेखक: मदन राजेवाडीकर) हे ऐतिहासिक नाटक उरण तालुक्यातील 'मोठे बोम' येथे मोठ्या उत्साहात पार पडले. श्री हनुमान नाट्य मंदिराच्या वतीने सादर करण्यात आलेल्या या प्रयोगाने उपस्थित रसिक प्रेक्षकांच्या डोळ्यांचे पारणे फेडले.

या नाट्यप्रयोगाचे दिमाखदार उद्घाटन जासई जिल्हा परिषद गटाचे सदस्य डॉ. मनीष पाटील यांच्या हस्ते आणि इतर मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. ज्येष्ठ दिग्दर्शक वसंत चिर्लेकर यांच्या मार्गदर्शनाखाली, दिग्दर्शक विजय केणी, सह-दिग्दर्शक सुनील पाटील आणि चंद्रशेखर पाटील यांनी स्थानिक कलाकारांकडून करून



घेतलेली तयारी रंगमंचावर स्पष्टपणे उमटली.

बबन पाटील, अनंत पाटील, संग्राम ठाकूर, विजय केणी, चंद्रशेखर पाटील, सुनील पाटील, ज्ञानेश्वर पाटील, अभिजीत पाटील, आशुतोष ठाकूर, सर्वेश पाटील, निलेश पाटील, अर्चना पाटील, श्रावणी म्हात्रे, राजेश पाटील, रितेश पाटील, साई ठाकूर, उदय पाटील, अतुल पाटील, संगम नारंगीकर, साई पाटील, कमलाकर पाटील, विवेक पाटील, साहिल केणी आणि दवेश नारंगीकर या सर्व कलाकारांनी आपापल्या भूमिकांत प्राण ओतले. अंगावर शहारे आणणारे प्रसंग, तलवारींच्या कसरती आणि धारदार संवादफेकीमुळे प्रेक्षकांना प्रत्यक्ष शिवकाळाचा अनुभव घेता आला.

या भव्य प्रयोगाच्या यशस्वीतेसाठी ग्रामस्थ मंडळ मोठे भोम आणि निर्माते घनश्याम पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले समीर नारंगीकर किशोर केणी नवनीत नारंगीकर दिलीप पाटील बबन पाटील सुनील पाटील श्याम पाटील आणि अनिल जोशी यांनी सहनिर्मातेची धुरा सांभाळली तर रोहन पाटील व सदानंद पाटील यांनी सूत्रधाराची भूमिका चौख बजावली. मोठे भोम प्राथमिक शाळेसह साहिल केळी राजेश पाटील शरद केणी निलेश ठाकूर आणि दत्तात्रय म्हात्रे यांचे मोलाचे सहकार्य लाभले

नाटकाला तांत्रिक बाजूने भक्कम साथ मिळाली ध्रुवराज म्हात्रे (ध्वनी ) राजेंद्र जोशी (प्रकाश योजना )चंद्रशेखर पाटील भगवान पाटील (नेपथ्य) नंदकुमार चिरनेर( रंगभूषा) चंद्रशेखर पाटील( वेशभूषा) यांनी दृश्य अनुभव समृद्ध केला संगीताची बाजू गणेश घरत (गायन) चैतन्य कडू( तबला) आणि उमेश गावंड (पार्श्व संगीत) यांनी समर्थपणे सांभाळली. स्मित पावर सर्विसेस आणि व्हिडिओग्राफीसाठी मनोहर फुंडेकर व मनोहर ठाकूर यांनी प्रसंग टिपण्यासाठी मोलाचे योगदान दिले. एका छोट्याशा खेडेगावातून आलेल्या या आचार्य जिद्दीच्या जोरावर स्थानिक कलाकारांनी सादर केलेली ही भव्य कलाकृती पाहू.न उपस्थित प्रेक्षक भारावून गेले ग्रामीण भागातील सुप्त गुणांना मिळालेली ही मोठी संधी असून आपल्या मातीतील या प्रतिभेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# गुगुळ पिंपरीत शिल्लक गावठाण जमीन सार्वजनिक कामांसाठी राखीव करा – बालाजीभाऊ देशमुख यांची ठाम मागणी

**दैनिक युवक आधार**

**हिंगोली जिल्हा प्रतिनिधी /प्रशांत टाकसाळ :** सेनगाव तालुक्यातील गुगुळ पिंपरी गावामध्ये मोठ्या प्रमाणात गावठाण जमीन उपलब्ध असतानाही शासकीय कार्यालये व इतर मूलभूत सुविधांसाठी जागा राखीव नसल्याने ग्रामस्थांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर उर्वरित गावठाण जमीन सार्वजनिक हिताच्या कामांसाठी राखीव करावी, अशी मागणी आम आदमी पार्टीचे जिल्हाप्रमुख बालाजीभाऊ देशमुख यांनी जिल्हाधिकारी, मुख्याधिकारी जिल्हा परिषद हिंगोली तसेच गटविकास अधिकारी पंचायत समिती सेनगाव यांच्या निदर्शनास आणून दिली आहे.

गावात एकूण 3 हेक्टर 18 आर इतकी गावठाण जमीन उपलब्ध आहे. यापैकी सुमारे 60 टक्के गायरान जमीन भूमिहीन व बेघर नागरिकांना वाटप करण्यात आली आहे. मात्र, काही नागरिकांनी एकापेक्षा अधिक ठिकाणी ताबा करून नमुना क्रमांक 8 मध्ये जागा नोंदवून घेतल्याचेही निदर्शनास आले आहे.

अशा परिस्थितीत गावातील तलाठी सज्जा कार्यालय, पोस्ट ऑफिस, आरोग्य उपकेंद्र, पशुवैद्यकीय दवाखाना, स्मशानभूमी, क्रीडांगण तसेच कृषी क्षेत्रातील सामूहिक प्रक्रिया केंद्रांसाठी जागा राखीव करणे अत्यंत आवश्यक



असल्याचे देशमुख यांनी नमूद केले. यामुळे अल्पभूधारक शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होऊन त्यांना योग्य बाजारभाव मिळण्यास हातभार लागेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

तसेच गावामध्ये सध्या 610 ते 620 दरम्यान घर क्रमांक नमुना क्रमांक 8 मध्ये नोंदवलेले असून, यापुढे सार्वजनिक हितासाठी आवश्यक जागा राखीव होईपर्यंत कोणालाही जमीन वाटप करू नये, आणि तेही मुख्याधिकारी हिंगोली यांच्या परवानगीशिवाय होऊ नये, अशी मागणीही देशमुख यांनी प्रशासनाकडे केली आहे.

दरम्यान, या मागणीची दखल घेत जिल्हा परिषद मुख्याधिकारी विवेक गायकवाड यांनी यासंदर्भात तात्काळ अंमलबजावणी करण्याचे आश्वासन दिल्याची माहिती समोर आली आहे.

# ग्रामीण भागातही जागरूकता; चालबर्डी येथे यशस्वी रक्तदान शिबिर

## जीवनदानाचा संकल्प; चालबर्डीत ५३ रक्तदात्यांचा सहभाग

**दैनिक युवक आधार**

**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी/ जितेंद्र खोडे :** पांढरकवडा तालुक्यातील चालबर्डी येथे अमर पाटील चालबर्डीकर व अभि बेले मित्रपरिवार यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार,दि.०५ एप्रिल २०२६ रोजी समाज मंदिर येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. सकाळी १० ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत पार पडलेल्या या उपक्रमास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.विशेष म्हणजे, ग्रामीण भागातील छोट्याशा चालबर्डी गावात आयोजित या शिबिरात तब्बल ५३ रक्तदात्यांनी सहभाग नोंदवत रक्तदान केले, ही उल्लेखनीय बाब ठरली.नागपूर येथील जीवन ज्योती ब्लड बँकेमार्फत रक्तसंकलन करण्यात आले. सदर संस्था थॅलेसेमिया, सिकलसेल व ॲनिमिया रुग्णांना मोफत रक्तपुरवठा करते. सध्या रक्ताची कमतरता जाणवत असल्याने रुग्णांना मदत व्हावी या उद्देशाने या शिबिराचे



आयोजन करण्यात आले होते.शिबिराचे उद्घाटन सामाजिक कार्यकर्ते अमर पाटील चालबर्डीकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अभि बेले, साईराम रंगनेनिवार, अरविंद झाडे, जितेंद्र पायताडे, दिलीप टेकाम, साजीद शेख, प्रेम तिरमनवार, रुतेश ध्यावरेनिवार, अभिनव गोणेवार,अमित गोणेवार, गणेश माडपेल्लीवार, राहुल चंदावार, सचिन कायपेल्लीवार, शुद्धोधन मोडक,करण झाडे,शंकर मग्गीडवार, विपीन कडलवार, प्रेमदीप भोंग, प्रतीक झाडे, नागेश टेकाम आदी उपस्थित होते.रक्तसंकलनाचे कार्य जीवन ज्योती ब्लड बँकेच्या वैद्यकीय पथकाने यशस्वीरित्या पार पाडले. या पथकात डॉ. यश हिंगले यांच्यासह श्रवण येलेकर, अरुण मोरांडे, सुप्रिया डोंगरे, भाविका गाते, धनश्री घुगुसकर, ईशा मॅडम, दिनेश रामटेके, रविंद्र साखरकर, प्रदीप शेंदरे आणि विवेक यादव यांचा समावेश होता.

रक्तदात्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच आयोजकांच्या वतीने सर्व रक्तदात्यांसाठी चहा, बिस्कीट, फळे व भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. याशिवाय प्रत्येक रक्तदात्यास पाणी साठवण्यासाठी ५ लिटरची प्लास्टिक कॅन भेट म्हणून देण्यात आला.या उपक्रमास दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल डॉ. यश हिंगले यांनी सर्व रक्तदात्यांचे आभार मानले.

# शालेय सहलींतून एसटीला मिळाले १२७ कोटींचे उत्पन्न – परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची माहिती

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे/विदर्भ संपादिका :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात शालेय सहलींसाठी २५ हजार ५५८ बस फेऱ्यांच्या माध्यमातून लाखो विद्यार्थ्यांची सुरक्षित वाहतूक करत तब्बल १२७ कोटी १८ लाख रुपयांचे विक्रमी उत्पन्न मिळवले आहे. हे उत्पन्न मागील वर्षाच्या तुलनेत ३३ कोटी २९ लाखांनी अधिक असून, "शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित सहलींसाठी एसटीशिवाय पर्याय नाही," हे पुन्हा एकदा अधोरेखित झाल्याचे प्रतिपादन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केले.

मंत्री सरनाईक म्हणाले की, 'शालेय सहल' हा प्रत्येक विद्यार्थ्याच्या आयुष्यातील एक हळवा आणि संस्मरणीय अनुभव असतो. शैक्षणिक वर्षात विविध धार्मिक व ऐतिहासिक पर्यटन स्थळांना भेट देण्यासाठी शाळा आणि महाविद्यालयांकडून सहली आयोजित केल्या जातात. या सहली एसटीच्या माध्यमातून आयोजित केल्यास



विद्यार्थ्यांना प्रवासी भाड्यात शासनाकडून ५० टक्के सवलत दिली जाते. त्यामुळे एसटीमार्फत आयोजित सहली सुरक्षित, विश्वासार्ह आणि माफक दरात उपलब्ध होतात. विशेषतः ग्रामीण भागातील लाखो विद्यार्थी-विद्यार्थिनींना याचा मोठा लाभ होतो.

यंदाच्या शैक्षणिक वर्षात राज्यभरातील विविध शाळा व महाविद्यालयांच्या मागणीनुसार एसटी महामंडळाने तब्बल २५ हजार ५५८ बस फेऱ्या उपलब्ध करून दिल्या. या फेऱ्यांद्वारे लाखो विद्यार्थ्यांनी विविध धार्मिक व ऐतिहासिक पर्यटन स्थळांना भेटी देत सुरक्षित आणि सुखकर प्रवास केला. या उपक्रमातून महामंडळाला १२७ कोटी १८ लाख रुपयांचे उत्पन्न मिळाले असून, ते मागील वर्षाच्या तुलनेत ३३ कोटी २९ लाखांनी अधिक आहे.

यावर्षी बहुतांश शालेय सहलींसाठी एसटीने नव्या आणि अद्ययावत बसेस उपलब्ध करून दिल्यामुळे विद्यार्थ्यांचा प्रवास अधिक सुरक्षित, आरामदायी आणि समाधानकारक झाला.

भविष्यातही शालेय सहलींसाठी एसटी बसेस वेळोवेळी उपलब्ध करून दिल्या जातील. त्यामुळे येत्या शैक्षणिक वर्षात शाळा आणि महाविद्यालयांनी खाजगी बसेसऐवजी एसटी बसेसचा अधिकाधिक वापर करावा, असे आवाहन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केले आहे.

# सर्व जाती-धर्माला सोबत घेवून चालण्याची नारायण गडाची परंपरा - शिवाजी महाराज

## श्रीक्षेत्र नारायणगडाच्या ७४ व्या नारळी सप्ताहाची उत्साहात सांगता; लाखोंचा जनसागर उसळला

**दैनिक युवक आधार**

**गेवराई :प्रतिनिधी :** मराठवाड्यात थोर संत महात्म्यांनी जन्म घेवून जगाच्या उद्धारासाठी काम करुन समाजाचे हित साधले. तर सर्व जाती-धर्माला सोबत घेवून चालण्याची श्री क्षेत्र नारायणगडाची परंपरा आहे असे प्रतिपादन श्रीक्षेत्र नारायणगडाचे महंत प्रेममुर्ती शिवाजी महाराज यांनी केले. श्री.क्षेत्र नगद नारायण गडाचा ७४ वा भव्य नारळी सप्ताह गेवराई तालुक्यातील उमापुर येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या प्रसंगी लाखो भाविकांचा जनसागर महाप्रसाद घेण्यासाठी लोटला होता.

श्री क्षेत्र नगद नारायण गडाचे महंत प्रेममूर्ती शिवाजी महाराज यांचे 'नंदाच्या घराला । मज नेई गोकुळाला ॥१॥ माया उपजलीं तेथें । ठेवीं मज आणीं येथें ॥२॥' या अभंगावर भव्य काल्याचे हरीकीर्तन संपन्न झाले. दरम्यान यावेळी माजीमंत्री आ.धनंजय मुंडे, खा. निलेश लंके , आ.विजयसिंह पंडित यांनी सप्ताहाला भेट दिली तर कीर्तनप्रसंगी व्यासपीठावर श्रीक्षेत्र गोरक्षनाथ संस्थानचे महंत दत्ता महाराज गिरी, माजीमंत्री बदामराव पंडित, नामदेव महाराज शेकटेकर, उत्तराधिकारी संभाजी महाराज, नारायण महाराज, शिवाजी म. गिरी, माजी सभापती युधाजित पंडित, बप्पासाहेब तळेकर, ॲड.महादेव तुपे , जिल्हाध्यक्ष चंद्रकांत नवले, युवा उद्योजक गणेश नलावडे, युवा नेते रोहित पंडित, हभप हरिदास जोगदंड, जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, अमोल करांडे, मुकुंद बाबर यांसह संत-महंत व विविध क्षेत्रातील



मान्यवर तसेच गडाचे टाळकरी, वारकरी, गायक , वादक, भजनी मंडळ, विणेकरी तसेच भक्तगण मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे बोलताना महंत शिवाजी महाराज म्हणाले की, संत नगदनारायण महाराजांची सेवा केल्यानंतर नगद प्रसाद मिळतो. गेल्या आठ दिवसांपासून ग्रामस्थांनी केलेल्या नियोजनामुळे हा सप्ताह न भूतो न भविष्यती अशा प्रकारचा झाला आहे. सर्वांनी एकत्र येवून केला जातो त्याला काला असे म्हणतात. संतांच्या आशीर्वादाने काला घ्यावा तर स्वानंद सुखनिवासी संत कुलभूषण महात्मा श्री नगद नारायण महाराजांच्या आशीर्वादात खूप मोठी ताकद आहे. त्यांच्या आशीर्वादाने मला त्यांच्या जाग्यावर बसवलं तर सर्वांना सुख मिळावे यासाठी नारळी सप्ताहाच्या धर्म मंडपात ही संतांची प्रतिज्ञा असते. प्रत्येकाने समाजात वावरताना लीन आणि नम्र रहा आणि साधुसंतांचा आशीर्वाद प्राप्त करा. तर तरुणांनी या भक्ती मंडपात येवून भक्तीमय वातावरण अनुभवले , हा भक्ती सोहळा भव्य दिव्य पार पडला तर प्रत्येकाने गाईची आणि आईची सेवा करावी व रामकृष्ण हरी हा नामजप करावा असा मौलिक सल्लाही त्यांनी शेवटी बोलताना दिला. या सप्ताहात उमापूर ग्रामस्थांसह मारोतीचीवाडी तसेच पंचक्रोशीतील भाविकांनी तन-मन-धनाने सहकार्य केल्याने नारळी सप्ताह मोठ्या उत्साही आणि भक्तिमय वातावरणात पार पडला. यावेळी कीर्तनानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी महिला व पुरुष भाविकांचा जनसागर उसळला होता.

**उमापुरकरांचे सुंदर नियोजन ; शिवाजी महाराजांनी केले कौतुक**

श्री क्षेत्र नारायणगडाच्या ७४ व्या भव्य नारळी सप्ताहासाठी उमापुर, मारोतीचीवाडी येथील ग्रामस्थ गेल्या सहा महिन्यांपासून नारळी सप्ताहाच्या नियोजनाला लागलेले होते. भव्य धर्म मंडप म्हणजे स्वायत्त कल्याणचे ठिकाण आहे. भव्य सोहळा उमापुर करांनी सार्थकी लावला. आज तुम्ही सर्वांनी तन मन धनानी सेवा केल्याने या वर्षीच्या ७४ व्या नारळी सप्ताहाला आगळेवेगळे स्वरुप प्राप्त झाले . सप्ताह काळात आलेल्या सर्व भाविकांना भोजन आणि पाण्याची व्यवस्था व्हावी म्हणून गावातील लहान मुलांपासून महिला तसेच आबाल वृद्धांपर्यंत सर्व जण भाविकांच्या सेवेत हजर होते. त्यामुळे सुंदर नियोजन केल्याबद्दल महंत शिवाजी महाराजांनी उमापुरकरांचे कौतुक केले.

**श्रीक्षेत्र नारायणगडावर होणार ७५ वा अमृतमहोत्सवी नारळी सप्ताह**

श्रीक्षेत्र नारायणगडाचा यंदाचा ७४ वा भव्य नारळी सप्ताह उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात उमापुर येथे संपन्न झाला तर पुढच्या वर्षीचा ७५ वा भव्य अमृत महोत्सवी सप्ताह सन -२०२७ ला श्रीक्षेत्र नारायणगड येथे येथे होणार असल्याची घोषणा गडाचे महंत शिवाजी महाराज यांनी काल्याच्या कीर्तनानंतर यावेळी बोलताना केली.

# निफाड येथे ‘शिवशौर्यगाथा’ प्रदर्शनाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## शिवकालीन शस्त्रांचा प्रत्यक्ष अनुभव; चिमुकल्यांमध्ये इतिहासाविषयी जागृती

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी/राहुल कुलकर्णी** : महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक विभागाच्या पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय तसेच मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ‘शिवशौर्यगाथा’ या शिवकालीन शस्त्रांच्या फिरत्या संग्रहालय प्रदर्शनाला निफाड येथील वैनतेय प्राथमिक विद्यामंदिरातील चौथीच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त भेट दिली. या प्रदर्शनातून विद्यार्थ्यांनी शिवकालीन युद्धसामग्रीचा प्रत्यक्ष अनुभव घेत इतिहासाशी जवळीक साधली.

चौथीच्या अभ्यासक्रमात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या इतिहासाचे



अध्ययन सुरू असताना या प्रदर्शनामुळे विद्यार्थ्यांना शस्त्रांची प्रत्यक्ष माहिती मिळण्याची अनोखी संधी लाभली. होरायजन अकॅडमी, निफाड येथे आयोजित या उपक्रमात स्लाइड शो व प्रोजेक्टरद्वारे चित्रफिती दाखविण्यात आल्या. तसेच तलवार, दांडपट्टा, कट्यार, बिचवा, वाघनखे, भाले, ढाल, चिलखत, शिरस्त्राण, कुकरी आदी शस्त्रांचे प्रत्यक्ष दर्शन विद्यार्थ्यांना घडविण्यात आले.

या वेळी विद्यार्थ्यांनी ‘छत्रपती शिवाजी महाराज की जय’ व ‘जय भवानी, जय शिवाजी’ अशा घोषणांनी परिसर दुमदुमून टाकला. शिक्षक गोरख सानप यांनी विद्यार्थ्यांना प्रत्येक शस्त्राचे ऐतिहासिक महत्त्व आणि उपयोग यांची सविस्तर माहिती दिली.

शून्यातून स्वराज्य उभे करणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमातून प्रेरणा घेण्याचा संदेशही या प्रदर्शनातून विद्यार्थ्यांना देण्यात आला. निफाड तालुक्यातील विविध शाळांतील विद्यार्थ्यांना या ऐतिहासिक उपक्रमाचा लाभ मिळाल्याबद्दल पालक, शिक्षक व शिवप्रेमींनी आयोजकांचे आभार मानले.

या संदर्भात विद्यार्थी शिवराज ढमाले म्हणाला, “कट्यार, तलवार, दांडपट्टा आणि वाघनखे याबद्दल फक्त ऐकले होते. आज प्रत्यक्ष पाहून खूप आनंद झाला. शिवरायांच्या कार्यातून आम्हाला नवीन काही करण्याची प्रेरणा मिळाली.”या प्रदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाविषयीची आवड वाढून राष्ट्रप्रेम व प्रेरणा जागृत होत असल्याचे चित्र पाहायला मिळाले.

# मराठा चषकाच्या चौथ्या पर्वावर स्वराज्य MIDCची मोहर

**दैनिक युवक आधार**

**खांदा कॉलनी, पनवेल** : सकल मराठा समाज मंडळ, खांदा कॉलनी आयोजित मराठा चषक २०२६ (पर्व ४ थे ) ही ओव्हरआर्म क्रिकेट स्पर्धा रविवार दिनांक ५ एप्रिल २०२६ रोजी महात्मा शाळेच्या मैदानावर अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात आणि दिमाखात पार पडली.

या स्पर्धेत एकूण १४ संघांनी सहभाग नोंदवला होता. अतिशय चुरशीच्या आणि रंगतदार सामन्यांनंतर स्वराज्य MIDC संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत विजेतेपद पटकावले. सूर्योदय संघ उपविजेता ठरला, तर साई ११ संघाने तृतीय क्रमांक पटकावला.

स्पर्धेसाठी विविध क्षेत्रातील मान्यवर प्रायोजकांचे मोलाचे सहकार्य लाभले, त्यामुळे स्पर्धेची रंगत अधिकच वाढली. सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून खेळाडूंना प्रोत्साहन दिले.

संपूर्ण कार्यक्रमाचे प्रभावी व सुबक यशस्वी आयोजनामागे सकल मराठा समाज मंडळाचे अध्यक्ष संतोष जाधव, सचिव सदानंद शिर्के व



कार्यकारी मंडळ - सदस्य, सल्लागार, सभासद यांची मेहनत आणि नियोजन विशेष उल्लेखनीय ठरले. या स्पर्धेच्या नियोजनाची व व्यवस्थापणाची जबाबदारी संजय मत्रे (बारक्या ) तर निवेदक म्हणून योगेश वाघ, दत्ता धोंडे यांनी पार पाडली.

एकंदरित, मराठा चषक २०२६ स्पर्धा ही खेळाडूंच्या उत्कृष्ट खेळामुळे आणि आयोजकांच्या उत्तम व्यवस्थापनामुळे सर्वांच्या स्मरणात राहील अशी भव्य आणि यशस्वी ठरली.

## पहेला येथे सम्यक बौद्ध विहार तर्फे भारतरत्न डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त 12, 13, १४ एप्रिल ला विविध कार्यक्रमाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे/भंडारा** :' तालुक्यातील पहेला येथे भारतरत्न, बोधिसत्व ,विश्वरत्न ,डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्ताने १२ एप्रिल ला रात्री 9.30 वाजता सुप्रसिद्ध गायिका अश्विनी रोशन चंद्रपूर यांचा भीमगीत समाज प्रबोधनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. १३ एप्रिल ला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित ५० गुणांचे बहुपर्यायी सामान्य ज्ञान परीक्षा दुपारी २ वाजता आयोजित करण्यात आलेली आहे. तर १४ एप्रिल ला



सायंकाळी ४ वाजता धम्म रॅली व रात्री ८ वाजता स्नेह भोजनाचे आयोजन करण्यात आलेले आहे करिता वरील कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन सम्यक बौद्ध विहार , नवयुवा भीम विचार मंच पहेला यांनी केलेले आहे.

# गाईवरील कारवाईविरोधात गोसेवक आक्रमक

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे :** मंदिरांसमोर पूजेसाठी ठेवण्यात येणाऱ्या गाईवर होणाऱ्या कारवाई विरोधात नाथपंथी डवरी गोसावी समाजाने तीव्र संताप व्यक्त केला आहे. या कारवाईमुळे शेकडो कुटुंबांच्या उपजीविकेवर गदा आली असून शासनाने तातडीने हस्तक्षेप करून न्याय द्यावा, अशी मागणी भटक्या व विमुक्त जाती संघ, मुंबईचे राष्ट्रीय अध्यक्ष मच्छिंद्र भोसले यांनी केली.

मुंबई मराठी पत्रकार संघ येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी भोसले यांनी सांगितले की, मुंबईतील मलबार हिल, नाना चौक, ग्रँट रोड, चिराबाजार, गावदेवी पोलीस ठाणे परिसर, व्ही.टी., एल.टी. मार्ग, कुलाबा, मुंबई सेंट्रल आदी भागांतील मंदिरांसमोर पूजेसाठी ठेवण्यात आलेल्या सुमारे




शंभर गाईंवर पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईत प्रत्येकी १,२५० रुपयांचा दंड आकारण्यात आला असून काही ठिकाणी गाईंना ताब्यात घेण्यात आले आहे.नाथपंथी डवरी गोसावी समाजातील गोसेविका माता-भगिनी अनेक वर्षांपासून मंदिरांमध्ये भक्तांना पूजेसाठी गाई उपलब्ध करून देण्याचे कार्य करीत आहेत. भक्तांकडून मिळणाऱ्या दानावरच त्यांच्या कुटुंबांचा उदरनिर्वाह चालतो. मात्र अलीकडे सुरू झालेल्या कारवाईमुळे त्यांच्या उपजीविकेचा प्रश्न निर्माण झाला असल्याचे भोसले यांनी सांगितले.या पार्श्वभूमीवर यापूर्वी २५ मार्च २०१६ रोजी गोसेविका महिलांनी मुंबईतील आझाद मैदान येथे मोठ्या संख्येने एकत्र येत आंदोलन केले होते. त्यानंतर महाराष्ट्र राज्य गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा (राज्यमंत्री दर्जा) यांनी ३१ एप्रिल २०१६ रोजी मुंबईतील भाजप कार्यालयात गोसेविका महिलांची बैठक घेतली होती. या बैठकीत मंदिर परिसरातील गाईंना कायदेशीर संरक्षण देण्याबाबत सकारात्मक भूमिका घेण्याचे आश्वासन देण्यात आल्याचा दावा आंदोलनकर्त्यांनी केला.या पत्रकार परिषदेला भटक्या व विमुक्त जाती संघ, मुंबईचे प्रदेशाध्यक्ष कृष्णा शिंदे, अध्यक्षा कल्पना चव्हाण, किशोर शिंदे, सुरेश साळुंखे, नंदा शिंदे, रेखा शिंदे, दयानंद शिंदे आदी उपस्थित होते.“हिंदू धर्मात गाईला पवित्र स्थान आहे. मंदिर परिसरात पूजेसाठी ठेवलेल्या गाईंवर कारवाई करणे दुर्दैवी आहे. शासनाने या धार्मिक परंपरेचा विचार करून मंदिर परिसरातील गाईंना कायदेशीर संरक्षण द्यावे,” अशी मागणी मच्छिंद्र भोसले यांनी केली. तसेच या प्रकरणी राज्य सरकारने तातडीने हस्तक्षेप करून गोसेविका महिलांना न्याय द्यावा, अशीही मागणी त्यांनी केली.

# सिने-नाट्य सांस्कृतिक गुढी चा पहिलावहिला कलावंत मेळावा दिमाखात संपन्न..!

**दैनिक युवक आधार**

**मुंबई प्रतिनिधी/गुरुनाथ तिरपणकर** : नुकताच सिने-नाट्य सांस्कृतिक गुढी चा पहिलावहिला कलावंत मेळावा राशी स्टुडिओ, माने वखार, करीरोड, मुंबई 12. या ठिकाणी प्रसिद्ध सिने-नाट्य कलावंत, दिग्दर्शक, तंत्रज्ञ, निर्माते यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. हा मेळावा एकत्रितरीत्या साजरा करण्यामागे उद्देश एवढाच होता कीं तळागाळातील सर्व कलावंतांनी एकत्र यावे, विचारांची देवाणघेवाण व्हावी, त्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा शिवाय एकमेकांच्या भेटीगाठी होऊन कामासंदर्भात चर्चा होईल आणि प्रत्येक कलावंताला त्याच्या हाताला काम मिळेल. या मेळाव्याचे आयोजन



सर्वश्री दिलीप दळवी, डॉ.किशोर खुशाले, अनिल सुतार, महेश्वर तेटांबे, शीतल माने-शेळके आणि सिद्धी कामथ यांनी केले. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणुन महाराष्ट्र बाजारपेठ चे संस्थापक,अध्यक्ष डॉ.कौतिक दांडगे, प्रसिद्ध नृत्यदिग्दर्शक सदानंद राणे, प्रसिद्ध हास्य अभिनेते कांचन पगारे आदी मान्यवर उपस्थित होते. या मेळाव्यात अनेक कलावंतांनी सहभाग घेऊन आपली कला सादर केली त्यात प्रामुख्याने लावणी नृत्य, एकपात्री अभिनय, नाट्य प्रवेश, कराओके गायन आणि खास करून प्रसिद्ध नृत्य दिग्दर्शक अनिल सुतार यांनी स्व.शाहीर दादा कोंडके यांच्या गीतांवर केलेलं नृत्य आणि प्रसिद्ध वादक कलावंत डॉ.किशोर खुशाले यांनी काही निवडक वाद्यांची माहिती आपल्या कल्पकतेने मांडून रसिकांची वाहवा मिळवली. प्रसिद्ध अभिनेत्री सिद्धी कामथ यांनी या संपूर्ण कार्यक्रमाचं सूत्रसंचालन आपल्या मधाळ आणि रसाळ वाणीने करून रसिक प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केलं. आणि महेश्वर भिकाजी तेटांबे यांनी जमलेल्या सर्व कलावंत, अतिथी यांचे आभार मानले. हा पहिलावहिला कलावंत यशस्वी करण्यासाठी सिद्धी कामथ आणि शीतल माने-शेळके यांनी विशेष मेहनत घेतली. त्याचप्रमाणे या मेळाव्यासाठी सर्वश्री.अरविंद घेवडे, प्रमोद मोहिते, आबा पेडणेकर, शंकर पिसाळ, अविनाश राऊत, उदय साटम यांनी सर्वतोपरी सहकार्य केलं. अशा तऱ्हेने कलावंतांच्या उत्साहात पहिलावहिला कलावंत मेळावा जोशात आणि दिमाखात संपन्न झाला.

# महावितरणच्या बेजबाबदार पणामुळे खांदा कॉलनीत नागरीक त्रस्त

**दैनिक युवक आधार**

**खांदा कॉलनी प्रतिनिधी** : पावसाळया पुर्वी आपत्कालीन व्यवस्थापन म्हणून महावितरण तसेच पनवेल महापालिका विविध ठेकेदारांना कंत्राटं देत असते परंतु हे ठेकेदार संबंधित कामे नीट करत नसल्याने याऊलट त्याचा त्रास नागरिकांनाच होतो याचा प्रत्यय पुन्हा एकदा खांदा कॉलनीत मुख्य रस्त्यावरील दुकानदारांना आला मंगळवारी झाडाच्या फांद्या तोडण्यासाठी नेमलेल्या कंत्राटदाराने तोडलेल्या झाडाच्या फांद्या तशाच रस्त्यावर टाकल्याने खांदा कॉलनीतल मुख्य रस्त्यावर वाहतूक खोळंबा तर झालाच शिवाय दुकानदारांच्या समोरच फांद्या पडल्याने अनेक दुकानदारांनी नाराजी व्यक्त केली तसेच या फांद्या फुटपाथवर पडल्याने अनेक नागरिकाना फुटपाथवर चालताना गैरसोय झाली यासंबंधी नागरिकांना तसेच दुकानदारांना होत असलेला



त्रास लक्षात घेऊन परिसरातील नगरसेविका सितातांई पाटील यांनी महावितरणचे कार्यकारी अभियंता यांना संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांचा संपर्क होऊ शकला नाही परंतु ठेकेदार जर अशा बेजबाबदारपणे पावसाळया पुर्वीची कामे करणार असतील तर कामे होऊ देणार नाही असा इशारा नगरसेविका सितातांई पाटील यांनी महावितरणला दिला संबंधित कामांवर प्रशासनाने लक्ष ठेवायला पाहिजे असेही त्यांनी सांगितले

## युवक नेतृत्वाचा उदय; इंजि. नितेश वानखडे यांचा बाजार समितीत गौरवाने सत्कार

**दैनिक युवक आधार**

**ज्ञानेश्वर काळे, तालुका प्रतिनिधी – दर्यापूर** : दर्यापूर तालुक्यात युवक नेतृत्वाला नवी दिशा देणारी घटना घडली असून युवक काँग्रेसच्या प्रदेश महासचिवपदी इंजि. नितेश वानखडे यांच्या झालेल्या नियुक्तीनिमित्त कृषी उत्पन्न बाजार समिती, दर्यापूरतर्फे त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला. परिसरातील राजकीय-सामाजिक वर्तुळात या कार्यक्रमाची मोठी चर्चा असून वानखडे यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.कार्यक्रमादरम्यान सभापती सुनील पाटील गावंडे यांनी नितेश वानखडे यांना वाढदिवसाच्या उष्ण शुभेच्छा देत,"युवकांच्या प्रश्नांवर प्रभावीपणे काम करणाऱ्या नेतृत्वाची आज गरज आहे. वानखडे यांच्या सक्रिय कार्यामुळे संघटनेला नवे बळ मिळेल," असा विश्वास व्यक्त केला.

कार्यक्रमातील मान्यवर उपस्थिती:

उपसभापती श्रीकृष्ण पाटील कराळे, संचालक प्रभाकर पाटील तराळ, गजानन पाटील देवतळे,



साहेबराव भदे, भारत आठवले, राजेश शेठ राठी, अनिल पाटील भारसाकडे, राजेश खेडकर, असिफ भाई खान यांनी उपस्थित राहून अभिनंदन केले. याशिवाय प्रदीप बाप्पू देशमुख, दिवाकरराव देशमुख, महेंद्र घाटे, अजय देशमुख, दिलीप पाटील गावंडे, सपकाळ यांसह अनेक मान्यवरांनी पुष्पगुच्छ देऊन वानखडे यांचा सन्मान केला.दर्यापूर तालुक्यातील युवकांमध्ये या निवडीमुळे उत्साहाचे वातावरण असून युवक नेतृत्वाला बळ देणारा हा निर्णय ठरत असल्याचे मत कार्यकर्त्यांनी व्यक्त केले. इंजि. नितेश वानखडे यांच्या पुढील राजकीय वाटचालीबाबत तालुक्यात नव्या अपेक्षा निर्माण झाल्या आहेत.

## आमदार भावनाताई गवळी पाटील यांच्या उपस्थितीत रिसोड येथे ईद–स्नेह मिलन सोहळा उत्साहात

### प्रतीक्षा तेजनकर (तहसीलदार, रिसोड) व ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती

**दैनिक युवक आधार**

**रिसोड. प्रतिनिधी/ रणजितसिह. ठाकूर** : सामाजिक ऐक्य, बंधुता आणि परस्पर स्नेह वृद्धिंगत करणारा पवित्र रमजान ईद सणाच्या पार्श्वभूमीवर रिसोड येथे ईद–स्नेह मिलन कार्यक्रम दि.४ एप्रिल रोजी उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास विधानपरिषद आमदार भावनाताई गवळी पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीने कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

या स्नेह मिलन सोहळ्यात



विविध धर्मीय बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. एकमेकांना शुभेच्छा देत सामाजिक सलोखा आणि बंधुभाव जपण्याचा संदेश देण्यात आला. रमजान ईद हा सण केवळ आनंदाचा नसून, तो संयम, त्याग आणि एकात्मतेची शिकवण देणारा असल्याचे मान्यवरांनी आपल्या मनोगतातून अधोरेखित केले.

कार्यक्रमाला शिवसेना तालुकाप्रमुख मच्छिंद्र पाटील ढोणे, उपनगराध्यक्ष विष्णू कदम, शिवसेना शहर प्रमुख अरुण मगर, रिसोडच्या तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर तसेच ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली. उपस्थित मान्यवरांनी मुस्लिम बांधवांना रमजान ईदच्या शुभेच्छा देत समाजात शांतता, सौहार्द आणि ऐक्य टिकवून ठेवण्याचे आवाहन केले.

यावेळी उपस्थित नागरिकांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद देत एकमेकांना मिठी मारून ईदच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमात स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. या माध्यमातून सर्व धर्मीय नागरिक एकत्र येत "एकता हीच खरी ताकद" हा संदेश अधोरेखित करण्यात आला.एकूणच, रिसोड येथे पार पडलेला हा ईद–स्नेह मिलन कार्यक्रम सामाजिक एकात्मतेचा आदर्श निर्माण करणारा ठरला.

## देगाव (कु.) सोसायटीचा एकमताने ठराव; जिल्हा बँक निवडणुकीत राजकीय तापमान वाढले

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी - अरविंद पांचाळ :** अर्धापूर तालुक्यातील देगाव (कु.)

सेवा सहकारी सोसायटीने महत्त्वपूर्ण निर्णय घेत ज्ञानेश्वर रंगराव कदम यांच्या नावाचा बिनविरोध ठराव मंजूर केला आहे. या ठरावामुळे त्यांना मतदानाचा अधिकार प्राप्त झाला असून, येऊ घातलेल्या नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत ते उमेदवारी अर्ज दाखल करण्याची शक्यता बळावली आहे. जिल्हा बँक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तालुक्यातील राजकीय हालचालींना वेग आला असून, विविध सेवा सहकारी सोसायट्यांकडून संभाव्य उमेदवारांच्या नावांना पाठिंबा दर्शविणारे ठराव मंजूर करण्यात येत आहेत. देगाव (कु.) सोसायटीचा हा ठराव त्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जात आहे.

दरम्यान, अर्धापूर तालुक्यातील एकूण २३ सेवा सहकारी सोसायट्यांनी आपापले ठराव पारित करून संबंधितांना मतदानाचा अधिकार बहाल करण्याची प्रक्रिया पूर्ण केली आहे.

यामध्ये बाबुराव कदम कोंढेकर, गणपतराव तिडके, बी.आर. कदम, सभापती संजय देशमुख लहानकर, डॉ. लक्ष्मणराव इंगोले, संचालक ज्ञानेश्वर राजेगोरे, ज्ञानेश्वर रंगराव कदम देगांवकर, दादाराव क्षिरसागर, दत्ता पाटील पांगरीकर, सुनिल पाटील शिंदे, प्रशांत आबादार, सौ. प्रतिभा भिमराव देशमुख, सौ. पुष्पाबाई पंजाबराव देशमुख, श्रीमती कचराबाई सखाराम गव्हाणे, अनिल मोळके, सत्यम कल्याणकर, साहेबराव सोळंके, पांडुरंग कदम, रमेश मुस्तरे, कचरू गाढे, विठ्ठल वानखेडे, बबनराव मूधळ आदींचा समावेश आहे.

या घडामोडींमुळे अर्धापूर तालुक्यातून नव्या चेहऱ्यांना संधी मिळण्याची शक्यता निर्माण झाली असून, जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या निवडणुकीत चुरस वाढणार असल्याचे संकेत मिळत आहेत. आगामी काळात या निवडणुकीकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागून राहणार आहे.

### पालोद आरोग्य केंद्रात 'जागतिक आरोग्य दिन' उत्साहात साजरा

## बदलत्या जीवनशैलीत व्यायामाकडे लक्ष देणे काळाची गरज – डॉ. सुरेश शिंदे

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड:-** "निरोगी शरीर हीच खरी संपत्ती आहे. सध्याच्या धावपळीच्या आणि बदलत्या जीवनशैलीमुळे आरोग्याच्या विविध समस्या निर्माण होत आहेत . अशा परिस्थितीत प्रत्येकाने आपल्या दैनंदिन आहाराकडे आणि नियमित व्यायामाकडे विशेष लक्ष देणे ही काळाची गरज आहे," असे प्रतिपादन वैद्यकीय अधिकारी डॉ. सुरेश शिंदे यांनी केले.

पालोद (ता. सिल्लोड) येथील आयुष्मान आरोग्य मंदिरात मंगळवारी (ता. ७) 'जागतिक आरोग्य दिन' विविध




उपक्रमांनी साजरा करण्यात आला, त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी आरोग्यविषयक जनजागृती करण्यात आली. दुसऱ्या वैद्यकीय अधिकारी डॉ. पूजा सपकाळ यांनी उपस्थित महिलांना मार्गदर्शन करताना महिला व बाल आरोग्याबाबत मोलाची माहिती दिली. ग्रामीण भागातील महिलांनी आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष न करता वेळोवेळी तज्ज्ञांकडून तपासणी करून घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

याप्रसंगी आरोग्य निरीक्षक योगेश भोटकर, किरणकुमार सोनवणे, प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी सोनाली गोडबोले, श्री. घुगरे, सुनील पालोदकर यांच्यासह आरोग्य केंद्रातील सर्व कर्मचारी, आशा स्वयंसेविका आणि ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आरोग्य केंद्रातील कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. आरोग्य केंद्राच्या वतीने ग्रामीण भागात दिल्या जाणाऱ्या आरोग्य सेवांबद्दल परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

## चांगला आहार हेच माणसाच्या आयुष्यातील उत्तम औषध – डॉ. स्वप्नील वाघ

### डायमंड स्पिरीट फाउंडेशनचा वर्धापन दिन सोहळा शांतीवनामध्ये संपन्न



**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी** : चांगला आहार हेच माणसाच्या आयुष्यातील उत्तम औषध आहे असे प्रतिपादन आहारतज्ञ डॉ.स्वप्नील वाघ यांनी डायमंड स्पिरीट फाऊंडेशनच्या चौथ्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित केलेल्या समारंभात केले.

डायमंड स्पिरीट फाउंडेशनच्या वर्धापन दिनानिमित्त पनवेलच्या शांतिवनातील कुष्ठरोग निवारण समितीच्या सभागृहामध्ये आयोजित केलेल्या समारंभासाठी कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखेचे अध्यक्ष जेष्ठ पत्रकार गणेश कोळी,अल्क्युविया कंपनीचे संचालक रमेश भुकन,शांतीवनाचे कार्यवाह नंदकिशोर उरणकर,शांतीवनाचे शिबिर प्रमुख नीलकांत कोळी,सिप्ला कंपनीचे सीनियर मॅनेजर ज्ञानेश्वर धनावडे, डायमंड स्पिरिट फाउंडेशनच्या संस्थापिका अध्यक्षा नम्रता धनावडे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

या कार्यक्रमांमध्ये फाउंडेशनने आपली सामाजिक बांधिलकी जपत खऱ्याअर्थाने शांतीवनातील कुष्ठरोग निवारण केंद्रामधील रुग्णांसाठी जेवण,आहार विषयक व्याख्यान आणि मनोरंजनात्मक खेळांचे आयोजन करण्यात आले.

यापुढे बोलताना डॉ.स्वप्निल वाघ म्हणाले की,औषधांवर अवलंबून राहण्यापेक्षा योग्य आहार आणि नियमित व्यायाम यांचा अवलंब केल्यास अनेक आजार टाळता येऊ शकतात तसेच पुरेशी झोप आणि मानसिक ताण कमी ठेवणेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे त्यांनी शेवटी सांगितले.

यावेळी कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखेचे अध्यक्ष जेष्ठ पत्रकार गणेश कोळी,शांतीवनाचे शिबिर प्रमुख नीलकांत कोळी यांची भाषणे झाली. डायमंड स्पिरिट फाउंडेशनच्या संस्थापिका अध्यक्षा नम्रता धनावडे यांनी आपल्या प्रास्ताविकात, फाऊंडेशनच्या चार वर्षांच्या कार्याचा आढावा सांगितला.

आमच्या फाउंडेशनच्या समाजसेवेचे व्रत हे निस्वार्थी आहे. शाब्दिक आधार देण्यापेक्षा दुसऱ्यांची दुःखे जाणून त्यात प्रत्यक्ष कृती करून,त्यांची दुःखे कमी करणे या प्रामाणिक हेतूने आज आम्ही काम करत आहोत असे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमासाठी शुभदा भुकन,उज्वला राले,अलका आव्हाड,सौजन्य पास्ते,आदिती उपासनी,शोभा ठोंबरे,कल्पना पाटील,क्रांती जाधव,लता पटेल,शर्मिला पटेल,सुवर्ण अनावकर,अपर्णा कीचक,ज्योती जैन,सुखदा पाटील या फाउंडेशनच्या सदस्या उपस्थित होत्या.

## कुमार आशीर्वाद यांनी स्वीकारली जिल्हाधिकारी पदाची सूत्रे

### मनपा आयुक्त डॉ. विपीन इटनकर यांनी दिल्या शुभेच्छा

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक/ नागपूर विभाग**: जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आज नागपूर जिल्हाधिकारी पदाची सूत्रे मावळते जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांच्याकडून स्वीकारली. यावेळी डॉ. इटनकर यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या. पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी विभाग प्रमुखांची बैठक बोलावून प्रत्येक विभागाचे कामकाज व त्या-त्या विभागांकडे असलेल्या महत्वाच्या योजना व विषयांबाबत आढावा घेतला. जिल्हाधिकारी कुमार




आशीर्वाद हे यापूर्वी सोलापूर येथे जिल्हाधिकारी या पदावर कार्यरत होते. गडचिरोली येथे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर कार्यरत असताना त्यांनी कोरोना काळात प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी राबविलेल्या फुलोरा उपक्रमाला राष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

सोलापूर येथे त्यांनी पारदर्शी प्रशासनाला अधिक चालना दिली

## मैदानांअभावी तरुणांची अवस्था 'विंचवाचे बिऱ्हाड पाठीवर' : महेंद्रशेठ घरत

**दैनिक युवक आधार**

**उलवे, प्रतिनिधी :** ग्रामीण भागातील तरुणांमध्ये टॅलेंट आहे; परंतु आजघडीला अनेक गावांत तरुणांना खेळण्यासाठी हक्काची मैदानेच नाहीत. त्यामुळे 'विंचवाचे बिऱ्हाड पाठीवर' या म्हणीप्रमाणे ग्रामीण भागातील तरुणांची हक्काच्या मैदानांअभावी अवस्था झालेली आहे. हे सारे विदारक चित्र बदलायचे असेल तर गावोगावच्या तरुणांनी सावध व्हायल हवे. त्यांनी आपल्या हक्काच्या मैदानांसाठी राजकीय चपला बाहेर ठेवून लढा उभारण्याची गरज आहे. सरकारची वक्रदृष्टी उरण, पेण परिसरातील शेतकऱ्यांच्या जमिनीवर पडली आहे. त्यामुळे आजही वेळ गेलेली नाही. तरुणांनी गुरचरण जमीन वा त्या अनुषंगिक जमिनीवर मैदाने तयार करावीत. ती अधिकृत करण्यासाठी मी आपल्या मागे खंबीरपणे उभा आहे. कारण आजपर्यंत अनेक गावांना




मी मैदाने मिळवून दिलेली आहेत. मी सर्वसामान्यांसाठी लढत आहे, असे आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी आपले मत उरण तालुक्यातील कोप्रोली येथे व्यक्त केले. त्यांच्या हस्ते चंद्रशेखर मित्र मंडळ आणि ग्रामस्थ मंडळ कोप्रोली आयोजित बापूजी देव चषकाचे भव्य उद्घाटन सोमवारी (ता.६) करण्यात आले. त्यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.


प्रकाशझोतातील टेनिस क्रिकेट सामन्यांचे आयोजन 'मी मराठी' मोठी जुईच्या मैदानावर करण्यात आले आहे. यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस सरचिटणीस मिलिंद पाडगावकर, जिल्हा परिषद सदस्य डॉ. मनीष पाटील, जिल्हा परिषद सदस्य अविनाश ठाकूर, उरण तालुका काँग्रेस अध्यक्ष विनोद म्हात्रे, उरण युवक काँग्रेस अध्यक्ष नितेश पाटील, अलंकार परदेशी, घनश्याम पाटील, ध्रुव म्हात्रे आणि एमजी ग्रुपचे सदस्य, काँग्रेस कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या टेनिस क्रिकेट सामन्यांसाठी चंद्रशेखर ठाकूर, अमेय पितळे, प्रितेश पाटील, अक्षय कोळी, अनिकेत ठाकूर आणि ग्रामस्थांनी मेहनत घेतली आहे. यावेळी उत्कृष्ट सूत्रसंचालन नितेश पंडित यांनी केले.

## बोकडवीरा एमएससीबी वीज निर्मिती प्रकल्पाच्या बाजूचा उड्डाणपूलही अस्तित्व टिकून राहन्यासाठी आधाराची वाट पाहत आहे उभा ?

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी/प्रदीप पाटील :** काही वर्षापूर्वी अवजड कन्टेनर ट्रेलरचीवाहतूक सुरळीतपणे सुरु राहून आयात निर्याती साठी जाणाऱ्या मालाचे कन्टेनर वेळेत बंदरात पोहचण्यासाठी उड्डाणपूल तयार केले आहेत मात्र या पुलावरून वाहतूक सुरु झाल्यावर वर्षभराच्या कालावधीतच पुलाला सातत्याने मलमपट्टी करण्याची वेळ आली. अखेर या मलमपट्टीने टिकाव न धरता जसखार येथील रत्नेश्वरी देवीच्या मंदिराच्या मागून जाणारा हा उड्डाणपूल देवीच्या मंदिराला तडे पडत स्वतालाही तडेपडून आदर्श भ्रष्टाचाराचा नमुना ठरला आहे.

या घटनेला जेमतेम एक सप्ताह होतोना होतो तोच द्रोणागरी नोड मधील बोकडवीरा गावा जवळील एमएससीबी वीज निर्मिती प्रकल्पाच्या बाजूला असणारा रेल्वे लाईन वरील उड्डाणपूल ही आत्ता टिकून राहणायासाठी आधाराची आणि अपघात होण्याची वाट पाहत आहे सर्वसाधारणपणे दोन वर्षापूर्वी हा उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुला केल्या नंतर वर्षभरातच उड्डाणपूलाच्या दोन्ही



टोकाला मलमपट्टी लावण्यावची सुरुवात करण्यात आली होती. आत्ता मात्र या पुलाचे ऑपरेशन करण्याची वेळ आली आहे, त्या नूसार आत्ता उड्डाणपूलावर प्रक्रिया सुरु करण्यात आली आली आहे उड्डाणपूल धोकादायक बनलेला असताना सुद्धा या उड्डाणपूलाच्या वरून एसटीबस,ट्रक.कार यांची वाहतूक सुरु आहे तर एकीकडे उड्डाणपूलाच्या मध्यवर्ती ठिकाणी ऑपरेशन ची तयारी सुरु आहे.

स्वतःला आधुनिक शहराचे शिल्पकार म्हणवून घेणाऱ्या सिडकोने द्रोणगिरी नोडची निर्मिती करताना परिसरात वहातुक नियत्रणकरण्या साठी व रेल्वे क्रोसिंगवर अनेक ठिकाणी उड्डाणपूलाची निर्मिती केली आहे.हे सारे उड्डाणपूल अलीकडच्या काळात तयार करण्यात आले असून सारेच पूल निकृष्ठ दर्जाच्या बांधकामाचा आदर्श नमुना ठरले आहेत. या अगोदर तीन ते चार वर्षा पूर्वी पागोटे धुतूम परिसरांतील उड्डाणपूलाचा काही भाग कोसळला होता. त्यानंतर चार ते पांच वर्षा पूर्वी जासइ गावाजवळील उड्डाणपूलाचे बांधकाम सुरु असतानाच उड्डाणपूलाचाकाही भाग कोसळून काही कामगार मृतू मुखी पडल्याची घटना घडली होती. त्यानंतर सेक्टर 15 मध्ये दिनांक14 मार्च 2021 मध्ये फुंडे गावाजवळील उरण जुनाशेवा गावाकडे जाणाऱ्या मार्गावरील बॉक्सकल्व्हर्ट वरुन प्रवास करीत असताना बॉक्सकल्व्हर्टचा स्लॅब अचानक पणे कोसळून झालेल्या दुर्घटनेत "दीपक कसूरकर" नावाचा तरुण आपल्या मोटरसायकल सह कोसळून त्याचा करूण अंत झाला होता.त्या नंतर सिडकोने या घटने नंतर सदरच्याघटने नंतर सिडकोच्या द्रोणगिरी नोड मधील सेक्टर 15 ते 59 मधील सर्वमार्गावरील बॉक्सकल्व्हर्टचे स्ट्रक्चरल ऑडीत करून त्यासर्वांची दुरूस्ती करण्यासाठी निविदा काढण्यात आली होती.द्रोणागिरी नोड परिसरात मोठया प्रमाणात उड्डाणपूलाची निर्मिती करण्यात आली आहे.

असून या सर्व उड्डाणपूलाच्या सुरक्षते बाबत आत्ता प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.तर एकीकडे उड्डाणपूलाचे काम सदोष व निकृष्ठ दर्जाचे असल्याचे सिद्ध होत आहे. आता या द्रोणागिरी नोड परिसरांतील सर्वच उड्डाणपूलाच्या सुरक्षतेचा प्रश्न ऐरणीवर आला असून या सर्वच उड्डाणपूलाचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याची मागणी जनते मधून होत असतानाच संबधीत ठेकेदारांच्या कामाची सखोलपणे चौकशी करून त्यांना काळ्या यादीत टाकण्याची मागणी त्याच बरोबर आशा पद्धतीने काम करून घेणाऱ्या अभियंत्यांचीही चौकशी करण्याची मागणी जनतेकडून करण्यात येत आहे.

# साई वृद्धाश्रम मित्रपरिवाराच्या वतीने सामाजिक बांधिलकीचे दर्शन

## आगीमुळे नुकसानग्रस्त दुकान चालकाला दिला मदतीचा हात

**दैनिक युवक आधार**

**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी -जितेंद्र खोडे :** राळेगाव- येथे गुरुवार दि.२ एप्रिल रोजी सायंकाळी विनोद शिवरकर यांच्या दुकानाला भिषण आग लागली,यात त्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले,आयुष्यभराची कमाई आणि उपजीविकेचे साधन डोळ्यादेखील खाक झाल्यामुळे शिवरकर कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला होता.

या कठीण प्रसंगात त्यांना सावरण्यासाठी 'साई वृद्धाश्रम मित्रपरिवाराने' पुढाकार घेतला. केवळ शाब्दिक सांत्वन न करता, प्रत्यक्ष कृतीतून सामाजिक बांधिलकी जोपासण्याचे काम या मित्रपरिवाराने केले आहे.साई वृद्धाश्रम मित्रपरिवाराच्या वतीने शिवरकर यांना या संकट समयी अल्पशी आर्थिक मदत सुपूर्द करण्यात आली.

पैशांच्या स्वरूपातील मदतीपेक्षाही,"आम्ही तुमच्या सोबत आहोत" ही भावना शिवरकर यांच्यासाठी अधिक मोलाची ठरली.मित्रपरिवाराने त्यांच्याप्रती आपल्या सहवेदना आणि संवेदना व्यक्त केल्या.नैसर्गिक आपत्ती किंवा अपघातामुळे



जेव्हा एखादा सामान्य माणूस कोलमडून पडतो,तेव्हा समाजाने अशाच प्रकारे एकत्र येऊन त्याला आधार देणे गरजेचे असते.साई वृद्धाश्रम मित्रपरिवाराने केलेल्या या कार्याचे राळेगाव परिसरात कौतुक होत आहे."माणुसकीची भिंत ही विटांची नसून मदतीच्या हातांची असते," हेच या उपक्रमातून पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.साई वृद्धाश्रम या सामाजिक कार्यात संजयभाऊ पोपट,विनय मुनोत,बाळू धुमाळ,निलय घिनमीणे,सागर वनस्कर,दर्शन मुनोत,हेमंत धोटे,मनीष गांधी,महेंद्र तुमने, योगेश मलोंडे,रिंकू हिकरे,निकेत भलमे,बादशाह काझी, चंदन जाधव,बाळू शेळके,आष्टकारभाऊ,समीर कुरेशी, अक्रम खान यांनी मोलाचे सहकार्य केले .

# नवबौद्ध वस्त्यांच्या विकास निधीला विलंब; सरपंच संघटनेचा आक्रमक पवित्रा

## मार्चपूर्वी मिळणारा १०% निधी रखडला ; ग्रामपंचायती अडचणीत, प्रशासनाला तात्काळ वितरणाची मागणी

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे /वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : नवबौद्ध वस्ती विकास योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या विविध कामांचा उर्वरित १० टक्के निधी मार्च महिन्यापूर्वी प्राप्त होणे अपेक्षित होते. मात्र अद्यापही हा निधी वितरित न झाल्यामुळे ग्रामपंचायतींमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. याच पार्श्वभूमीवर आज सरपंच संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी माननीय गटविकास अधिकारी यांना निवेदन देत तात्काळ निधी वितरित करण्याची जोरदार मागणी केली.

या योजनेतून अनेक गावांमध्ये पायाभूत सुविधा, रस्ते, नाले, वस्ती सुधारणा आदी कामे पूर्ण झाली आहेत. मात्र उर्वरित १० टक्के निधी न मिळाल्यामुळे संबंधित कामांचे देयक प्रलंबित असून ग्रामपंचायती आर्थिक





अडचणीत सापडल्या आहेत. त्यामुळे संबंधित ठेकेदार व कामगारांनाही पैसे देण्यात विलंब होत असल्याचे सरपंचांनी निदर्शनास आणून दिले.

आज दिलेल्या निवेदनात सर्व ग्रामपंचायतींना तातडीने हा निधी वर्ग करण्यात यावा, अन्यथा पुढील काळात तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला. प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन त्वरित निर्णय घ्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

या निवेदनावर सरपंच संघटना जिल्हाध्यक्ष पवन राऊत, राष्ट्रवादी युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष तथा सरपंच पांडव (ऊमरा - माळेगाव), प्रमोद भाऊ चौधरी (सरपंच सोंडा तथा सरपंच संघटना जिल्हा उपाध्यक्ष), वैभव भाऊ एकाडे (उपसरपंच ग्रामपंचायत गोंडेगाव) व राजू चौधरी (माजी सरपंच ग्रामपंचायत सुराळा) आदींच्या उपस्थितीत निवेदन सादर करण्यात आले.

प्रशासनाकडून लवकरात लवकर सकारात्मक प्रतिसाद मिळावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली असून, निधी वितरणात होत असलेला विलंब ग्रामविकासाच्या कामांवर परिणाम करत असल्याचेही यावेळी अधोरेखित करण्यात आले.

> **"नवबौद्ध वस्ती विकास योजनेतील कामे पूर्ण करूनही उर्वरित निधी मिळत नसल्यामुळे ग्रामपंचायती अडचणीत आल्या आहेत. प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन सर्व ग्रामपंचायतींना प्रलंबित १० टक्के निधी वितरित करावा, अन्यथा आम्हाला आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल."**
>
> **— प्रमोद भाऊ चौधरी**
> **जिल्हाध्यक्ष वाशिम राष्ट्रवादी युवक काँग्रेस**

# उभरते सितारे मध्ये 'भक्ती सागर'

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राहुल मडावी**

**नागपूर :** आज या मुलांच्या प्रतिभेचा अनुभव घेऊन खूप आनंद झाला. खूप शोध घेतलेल्या गोष्टी आम्हाला आमच्या काळात उपलब्ध नव्हत्या, कारण आम्हाला इतके सुंदर व्यासपीठ उपलब्ध नव्हते. भक्ती ही श्रद्धा, निष्ठा, समर्पण आणि एकाग्रतेने केलेल्या कर्माचा स्वरूप आहे, जी तुम्हाला तुमच्या ध्येयापर्यंत नेते. पण भक्तीत अंधश्रद्धेची कुठल्याही प्रकारची जागा नाही. अंधश्रद्धा म्हणजे पाखंड. आजच्या काळात मुलांसोबतच मोठ्यांनीही वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. हे विचार श्री गणेश वंजारी यांनी मुलांमधून आणि त्यांच्या पालकांमध्ये मांडले. दर्शकांना विचारलेल्या प्रश्नात कुणी भक्तीला प्रेम, कुणी करुणा, तर





कुणी निःस्वार्थ भावाची संज्ञा दिली.

विदर्भ हिंदी साहित्य सम्मेलनाचा नवोदित प्रतिभांना समर्पित उपक्रम 'उभरते सितारे' चे आयोजन हिंदी मोर भवनच्या उत्कर्ष हॉलमध्ये पार पडले. कार्यक्रमाचा विषय 'भक्ती सागर' या विषयावर आधारित शिक्षणात्मक, ज्ञानवर्धक आणि संगीतमय सादऱ्यांनी भरलेला राहिला. कार्यक्रमात विशेष अतिथी म्हणून सिंचन विभागाचे अभियंता गणेश वंजारीजी प्रमुखतेने उपस्थित होते. त्यांचा सन्मान आयोजक युवराज चौधरी यांनी स्वागत वस्त्र आणि स्मृतीचिन्ह देऊन केला.

त्यानंतर सर्व मुलांनी भक्ती सागर या विषयावर आपले सुंदर विचार मांडत शानदार नृत्य आणि गाण्यांच्या सादऱ्या दिल्या. यामध्ये लव्यम श्रीवास्तव, पर्णिका श्रीवास्तव, अवनी मेश्राम, सानवी मेश्राम, राम बागल, कुंदा मेश्राम, आदित मिंज आणि अर्चिता लखोटे यांनी उत्तम गाणी सादर केली. गार्गी गायकवाडच्या नृत्याने सर्वांना मंत्रमुग्ध केले.

मुलांच्या सादऱ्यांना त्यांच्या पालकांसोबतच गीता सुरेश मिंज, अंजना अंकुर श्रीवास्तव, यशोधरा ब्राह्मणे, अमीना चौधरी, वंदना जनबंधु, एसपी तिवारी, चंद्रसेन पाटील, संदेश हाडके, जवाहर राव, स्वाति गायकवाड, संदीप वानखेडे, अश्विनी अजय लखोटे, प्रीति बागल आणि वैशाली मदारे आदि यांनी खूप कौतुक केले. कार्यक्रमाच्या यशासाठी प्रशांत शंभरकर यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे कुशल संचालन करून उपस्थित सर्व प्रेक्षक, कलाकार आणि मुलांचे आभार आयोजक युवराज चौधरी यांनी आपल्या शब्दांत व्यक्त केले.

# गडचिरोलीत जमीन संपादन शेतकऱ्यांसाठी न्याय्य व पारदर्शक; जबरदस्तीला सरकारची शून्य सहनशीलता — मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका** : गडचिरोलीच्या चामोर्शी तालुक्यातील प्रस्तावित उद्योग प्रकल्पासाठी होणाऱ्या जमीन संपादन प्रक्रियेत शेतकऱ्यांचे हित सर्वोच्च राहील. "शासनाची कोणतीही जबरदस्ती होणार नाही. शेतकऱ्यांना न्याय्य, अधिकाधिक मोबदला व योग्य पुनर्वसनाची हमी देतो," असे स्पष्ट आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिले.

रामगिरी येथे चामोर्शी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने आमदार डॉ. मिलिंद नरोटे यांच्या नेतृत्वाखाली मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. यावेळी सहपालकमंत्री ॲड. आशिष जयस्वाल तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.



औद्योगिक विकासासोबत शेतकऱ्यांचा हितसंबंध सुरक्षित — फडणवीस

मुख्यमंत्री म्हणाले की, गडचिरोली जिल्हा 'लोह-पोलाद हब' म्हणून विकसित होत असून मोठ्या प्रमाणात उद्योग उभारणीसाठी संधी निर्माण झाल्या आहेत.

"विकासासाठी जमीन संपादन आवश्यक असले तरी शेतकऱ्यांवरील सक्ती ही सरकारची भूमिका नाही. संवादातून, सामंजस्यानेच मध्यम मार्ग काढला जाईल," असे त्यांनी स्पष्ट केले.

योग्य मोबदला + पुनर्वसन + रोजगाराच्या संधी

फडणवीस यांनी खात्री दिली की—

जमिनीच्या बदल्यात जास्तीत जास्त न्याय्य मोबदला

योग्य व सुसज्ज पुनर्वसनाची व्यवस्थास्थानिक भूमिपुत्र युवकांना प्राधान्याने रोजगार

यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करेल.

**शेतकऱ्यांना सकारात्मक भूमिकेचे आवाहन**

विकास प्रक्रियेत सर्वांना सहभागी करून घेण्याचा शासनाचा प्रयत्न असून शेतकऱ्यांनीही सकारात्मक सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

"सरकारची भूमिका स्पष्ट आहे — कोणाचीही जमीन जबरदस्तीने घेणार नाही; स्वेच्छेने जमीन देणाऱ्यांना सर्वाधिक लाभ दिला जाईल," असेही मुख्यमंत्री म्हणाले.

ही बैठक सकारात्मक वातावरणात पार पडली असून संबंधित प्रक्रियेत न्याय्य व पारदर्शक पद्धत अवलंबली जाईल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

# रायगड जिल्हा कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक संघटनेची वार्षिक सभा उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**माणगाव प्रतिनिधी :** रायगड जिल्हा कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक संघटनेची वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच माणगाव येथील शैक्षणिक संकुलात उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. या सभेत अध्यक्षपदाच्या निवडणुकीत प्रा भानुदास एन. बिरादार यांनी प्रभावी विजय मिळवत पुन्हा एकदा अध्यक्षपदावर विराजमान झाले. त्यांनी एकूण १०८ मते मिळवून प्रतिस्पर्धी उमेदवाराचा तब्बल ५७ मतांनी पराभव केला. व सलग दुसऱ्यांदा रायगड जिल्हा कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक संघटनेचे अध्यक्षपदी विराजमान होण्याचा मान मिळवला. सर्वांच्या सुख-दुःखामध्ये मदत करण्यासाठी ते नेहमीच अग्रेसर असतात शिक्षकांच्या समस्या सोडवण्यासाठी त्यांचे भूमिका अग्रगण्य





अशीच होती, याची प्रचिती सलग तीन वर्ष सर्व शिक्षकांना आलेली आहे. याचीच परिणीती म्हणून त्यांना या निवडणुकीमध्ये भरघोस मते मिळाली असल्याची भावना शिक्षकांनी व्यक्त केली. त्यांच्या या निवडीबद्दल संस्थेचे अध्यक्ष ज्येष्ठ विधीज्ञ श्री. राजीव साबळे, सचिव कृष्णाभाई गांधी, स्कूल कमिटीचे चेअरमन श्री. नरेंद्रशेठ गायकवाड, संचालक श्री.नितीनशेठ बामगुडे, डॉ पाटणकर, श्री घायाळ यांच्यासह सर्व संचालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वतीने त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले.

निवडणुकीत विजयी झाल्यानंतर प्रा बिरादार यांचे उपस्थितीत शिक्षकांनी जोरदार टाळ्यांच्या गजरात अभिनंदन केले. त्यांच्या नेतृत्वाखाली संघटनेचे कार्य अधिक बळकट होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.सभेत संघटनेच्या नव्या पदाधिकाऱ्यांची निवडही जाहीर करण्यात आली. त्यानुसार जिल्हा उपाध्यक्षपदी प्रा किशोर एस. पाटील व प्रा दत्ता एस. देवकर, सरचिटणीसपदी प्रा शामसुंदर एस. किर्तने, सहसचिवपदी प्रा नमिता जी. वानखेडे व प्रा सचिन एच. लोखंडे, खजिनदारपदी प्रा एच. एल. घोळवे, तर जिल्हा समन्वयकपदी प्रा निवांत बी. केदार यांची निवड करण्यात आली. तसेच विविध तालुक्यांसाठी अध्यक्षांचीही निवड जाहीर करण्यात आली असून अलिबाग, पेण, मुरुड, पनवेल, उरण, कर्जत, सुधागड, खालापूर, म्हसळा, श्रीवर्धन, तळा, महाड, माणगाव, रोहा व पोलादपूर या तालुक्यांचे प्रतिनिधी निश्चित करण्यात आले आहेत.

या सभेस महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाचे समन्वयक श्री. मुकुंदराव आंदळकर, उपाध्यक्ष श्री. रविंद्र भदाणे, माजी जिल्हाध्यक्ष श्री. जगदिश पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. निवडणूक प्रक्रिया श्री. आंदळकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. निरीक्षक म्हणून श्री. भदाणे, तर निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून श्री. जगदिश पाटील यांनी जबाबदारी पार पाडली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माणगाव तालुका अध्यक्ष प्रा शब्बीर हज्जू यांनी प्रभावीपणे केले. सभेच्या यशस्वी आयोजनाबद्दल आयोजकांचे कौतुक करण्यात आले असून, नव्या पदाधिकाऱ्यांकडून शिक्षकांच्या प्रश्नांवर ठोस काम होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

# एकाच कुटुंबातील दोघांची पोलीस दलात निवड

**दैनिक युवक आधार**

**श्री क्षेत्र माहूरगड/ प्रतिनिधी सय्यद ईसा** : मौजे दतमांजरी तालुका माहूर या छोट्याशा गावातील गणेश नारायण राठोड यांचे सुपुत्र ऋषिकेश गणेश राठोड यांची नांदेड पोलीस दलात नुकतीच निवड झाली आहे आणि मागच्या वर्षी त्यांची बहीण पायल गणेश राठोड हिची पण मुंबई पोलीस (चालक) म्हणून निवड झाली होती,अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत गणेश राठोड हे हाताला मिळेल ते काम करून आपल्या संसाराचा गाडा चालवितात त्यांनी रोज मजुरी करून आपल्या सर्व पाल्यांना शिक्षणाकरिता बाहेर गावी पाठविले आणि मुलांनी देखील त्याची जाण



ठेवून यश संपादन केले एक मुलगा नुकत्याच झालेल्या पोलीस भरती दरम्यान स्वतःच्या म्हणजे नांदेड जिल्ह्यात त्याची निवड झाली आहे आणि मुलगी कु. पायल राठोड यांची मुंबई पोलीस( चालक )म्हणून मागील वर्षी निवड झाली होती. ऋषिकेश राठोड नांदेड पोलीस आणि तिसरा मुलगा देखील अभिषेक राठोड हा देखील पोलीस भरतीला वेटिंग ला आहे हे विशेष सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# उलवेतील भाडे फसवणूक प्रकरण : आरोपी दुबईला पळाल्याची माहिती

**दैनिक युवक आधार**

**मुंबई (शांताराम गुडेकर)** : नवी मुंबई (उलवे) सेक्टर-०९ येथील परिसरात घडलेल्या भाडे व्यवहारातील मोठ्या फसवणुकीच्या प्रकरणाला नवे वळण मिळाले असून मुख्य आरोपी दुबईला पळून गेल्याची माहिती समोर आली आहे.फिर्यादी करुणा मिश्रा यांच्या तक्रारीनुसार, १० मे २०२५ रोजी आरोपी आणि यांनी त्यांना जास्त डिपॉझिटच्या नावाखाली फसवणूक केली. या प्रकरणात फिर्यादींकडून



₹२३,००,००० (तेवीस लाख रुपये) IMPS द्वारे आयसीआयसीआय बँक खात्यावर ट्रान्सफर करण्यात आले होते.आरोपींकडून व्यवहाराची खात्री पटवण्यासाठी बनावट बँक पावती देण्यात आली होती. मात्र, नंतर ती पावती एडिट केलेली व खोटी असल्याचे उघड झाले. या प्रकारामुळे फिर्यादींना मोठा आर्थिक तोटा सहन करावा लागला आहे.दरम्यान, तपासादरम्यान आरोपींपैकी एक जण दुबईला पळून गेल्याची माहिती मिळत आहे. या पार्श्वभूमीवर पोलिसांकडून अधिक सखोल तपास सुरू असून आरोपींना पकडण्यासाठी पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात येत आहे.या घटनेमुळे नागरिकांनी भाडे व्यवहार करताना अधिक सतर्क राहण्याची गरज पुन्हा अधोरेखित झाली आहे. कोणतीही मोठी रक्कम देण्यापूर्वी संबंधित व्यक्तीची खातरजमा करणे, कागदपत्रांची पडताळणी करणे आणि कायदेशीर करार करणे अत्यावश्यक आहे.पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, अशा प्रकारच्या फसवणुकीचा बळी ठरल्यास तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवावी.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करून मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# एका सर्पदंशाने उद्ध्वस्त झाला संसार; देवगावातील शेतकऱ्याचा दुर्दैवी अंत

## शेतात गवत कापताना सर्पदंश; उपचाराआधीच प्राणज्योत मालवली

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडांगे निफाड तालुका प्रतिनिधी :** देवगाव येथील महादेवनगर परिसरात सर्पदंशामुळे एका शेतकऱ्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना आज (दि. ०७ एप्रिल) सकाळी घडली. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.प्रशांत एल. जी. सोनवणे (वय ५३ वर्षे, रा. महादेवनगर, देवगाव) असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे. ते आज सकाळी सुमारे ८ वाजेच्या सुमारास आपल्या शेतात गवत कापत असताना त्यांच्या उजव्या पायाच्या अंगठ्याजवळ अचानक सर्पदंश झाला. घटनेनंतर कुटुंबीयांनी त्यांना तातडीने उपचारासाठी ग्रामीण रुग्णालय, लासलगाव येथे सकाळी ११ वाजता दाखल केले.



मात्र, तेथील वैद्यकीय अधिकारी डॉ. अमोल राठोड यांनी तपासून त्यांना मृत घोषित केले. या घटनेने सोनवणे कुटुंबाचा आधारच हिरावला गेला असून परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. दरम्यान, या प्रकरणी लासलगाव पोलीस ठाण्यात सीसीटीएनएस अकस्मात मृत्यू नोंद क्र. २३/२०२६, भारतीय नागरी सुरक्षा कायदा २०२३ चे कलम १९४ प्रमाणे नोंद करण्यात आली आहे. स.पो.नि. दीपक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार संदीप शिंदे अधिक तपास करीत आहेत.

# पनवेल येथे 'इच्छांचे दीप प्रवाही' पुस्तकाचे ११ एप्रिल रोजी प्रकाशन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल(प्रतिनिधी) :** डॉ. प्रभाकर पटवर्धन आणि नीलाताई पटवर्धन या सेवाभावी दांपत्याच्या कार्यस्मृती जागवणारे तसेच 'डॉ. प्रभाकर पटवर्धन स्मृती रुग्णालय' यांच्या स्थापनेपासून आजपर्यंतच्या सेवावाटचालीचा सविस्तर आणि प्रेरणादायी आढावा घेणारे ज्येष्ठ पत्रकार, लेखक सुधीर जोगळेकर लिखित 'इच्छांचे दीप प्रवाही' या संग्राह्य पुस्तकाचे प्रकाशन शनिवार, दिनांक ११ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे होणार आहे.

या कार्यक्रमाला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्य सुहासराव हिरेमठ हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहणार आहेत. सेवा, सामाजिक काम, संघटना आणि संस्थात्मक कार्य या विषयांवर ते मार्गदर्शक आणि प्रेरक विचार व्यक्त करतील. प्रमुख पाहुणे म्हणून पनवेल येथील प्रसिद्ध ज्येष्ठ नेत्र शल्यविशारद*डॉ. सुहास हळदीपुरकर आणि धूतपापेश्वर कंपनी लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजीत पुराणिक हे उपस्थित राहणार आहेत.


'इच्छांचे दीप प्रवाही' हे पुस्तक डॉ. प्रभाकर पटवर्धन आणि नीलाताई पटवर्धन यांच्या वैद्यकीय आणि सामाजिक सेवाकार्याचा प्रेरणादायी प्रवास उलगडणारे आहे. या पुस्तकामध्ये त्यांच्या कार्याची सुरुवात, समाजासाठी केलेले विविध उपक्रम, रुग्णसेवेला दिलेले प्राधान्य, तसेच रुग्णालयाच्या उभारणीपासून विस्तारापर्यंतचे महत्त्वाचे टप्पे सुलभ आणि ओघवत्या भाषेत मांडण्यात आले आहेत. अनेक आव्हानांचा सामना करत सेवा कार्य कसे उभे राहिले आणि वाढत गेले, याचेही चित्रण या पुस्तकात करण्यात आले आहे. त्यामुळे हे पुस्तक वैद्यकीय, सामाजिक आणि सेवाभावी क्षेत्रातील कार्यकर्ते, तरुण पिढी तसेच सर्वसामान्य वाचकांसाठी प्रेरणादायी आणि मार्गदर्शक ठरणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

या कार्यक्रमाचे निमंत्रक रुग्णालय कार्यकारिणीच्या अध्यक्षा डॉ. कीर्ती समुद्र आणि कार्यवाह राजीव समेळ यांनी पनवेल परिसरातील नागरिक, वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, रुग्णालयातील उपचारांमुळे बरे झालेले रुग्ण तसेच वाचकवर्ग यांनी या प्रकाशन सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन केले आहे.डॉ. प्रभाकर पटवर्धन रुग्णालय हे रा. स्व. संघ जनकल्याण समिती संचालित सेवा कार्य असून, समाजातील सर्व घटकांना परवडणारी, विश्वासार्ह आणि दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याचे कार्य या संस्थेमार्फत केले जात आहे. आरोग्यसेवेबरोबरच समाजोपयोगी उपक्रम, आरोग्य शिबिरे आणि जनजागृती कार्यक्रम या द्वारेही संस्थेचे कार्य विस्तारत आहे. या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेला हा पुस्तक प्रकाशन सोहळा साहित्यिक कार्यक्रमासह समाजकार्य आणि आरोग्यसेवेच्या क्षेत्रातील योगदानाचा गौरव करणारा आणि पुढील पिढीसाठी प्रेरणा देणारा ठरेल.

# मायाताई ईवनाते यांचा राज्यसभेचा शपथविधी संपन्न ;नागपूरच्या कार्यकर्त्यांची उपस्थिती

**दैनिक युवक आधार**

**राहुल मडावी नागपूर :** भारतीय जनता पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या आणि नागपूरच्या माजी महापौर मायाताई ईवनाते यांनी आज राज्यसभेचे सदस्य म्हणून अधिकृतरित्या शपथ घेतली. उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी शपथ दिली. एका निष्ठावान आदिवासी महिला कार्यकर्तीचा नागपूर महानगरपालिकेपासून सुरू झालेला हा प्रवास आज संसदेच्या उंबरठ्यापर्यंत पोहोचल्याने संपूर्ण विदर्भासह महाराष्ट्रात आनंदाचे वातावरण आहे.मायाताई ईवनाते यांचा राजकीय प्रवास अत्यंत खडतर आणि प्रेरणादायी राहिला आहे. २००२ मध्ये पहिल्यांदा नगरसेवक म्हणून निवडून आल्यानंतर, २००७ ते २००९ या काळात त्यांनी नागपूरचे महापौर पद समर्थपणे सांभाळले. त्यानंतर भाजप प्रदेश उपाध्यक्ष आणि राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगाच्या (NCST) सदस्य




म्हणून त्यांनी आदिवासी समाजाचे प्रश्न राष्ट्रीय स्तरावर मांडले. सध्या त्या नागपूर महानगरपालिकेत प्रभाग १२ मधून नगरसेविका आहेत.या ऐतिहासिक क्षणी नागपूर आणि महाराष्ट्रातील अनेक प्रमुख पदाधिकारी दिल्लीत उपस्थित होते. यामध्ये माजी आमदार व भाजपा अनुसूचित जमाती मोर्चा महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष डॉ. देवरावजी होळी, माजी आमदार सुधाकरजी देशमुख, भाजपा नागपूर महामंत्री संदीपजी जाधव, उपाध्यक्ष संजयजी बंगाले,किशनजी गावंडे,संजय गिरगावकर,नरेशजी बर्डे,नगरसेविका साधना बरडे, नगरसेविका दर्शनी धवड,भाजपा आदिवासी आघाडी शहर अध्यक्ष नागपूर आकाश मडावी, आफ्रोट संघटनेचे अध्यक्ष राजेंद्रजी मरसकोल्हे, उपाध्यक्ष महेंद्र उईके, विवेक नागभिरे, दत्ता खोडे, प्रशांत कुमरे, शिवा कोकर्डे, डॉ. आशिष कोरेटी आणि कैलास उईके यांचा समावेश होता.मायाताईंच्या निवडीने नागपूर भाजपमध्ये उत्साहाचे भरते आले आहे. पक्षाने एका जमिनीवर काम करणाऱ्या कार्यकर्त्याला ही संधी देऊन निष्ठेचा खऱ्या अर्थाने सन्मान केला असून, या नियुक्तीमुळे आगामी काळात आदिवासी समाजाचे आणि स्थानिक प्रश्नांचे प्रतिबिंब संसदेत उमटेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.या प्रसंगी भाजप शहर अध्यक्ष दयाशंकर तिवारी, महामंत्री श्रीकांत आगलावे,संदीप जाधव, रितेश गावंडे, मनीषाताई धावडे यांनी मायाताईंना शुभेच्छा दिल्या व त्यांचे कौतुक केले. दयाशंकर तिवारी म्हणाले की, "पक्षाने एका ज्येष्ठ आणि जमिनीवर काम करणाऱ्या महिला कार्यकर्त्याला राज्यसभेची ही संधी देऊन निष्ठेचा खऱ्या अर्थाने सन्मान केला आहे. मायाताईंचा प्रदीर्घ अनुभव आणि जनसंपर्क आता देशाला दिशा देण्याचे काम करेल." मायाताईंच्या या निवडीमुळे आगामी काळात आदिवासी समाजाचे आणि स्थानिक प्रश्नांचे प्रतिबिंब संसदेत अधिक ठळकपणे उमटेल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

# जनगणना क्षेत्रीय प्रशिक्षक प्रशिक्षण शिबिराचा शुभारंभ !!

## जनगणनेसाठी तीन हजाराहून अधिक मनुष्यबळ

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे प्रतिनिधी/अकोला :** जनगणना क्षेत्रीय प्रशिक्षक प्रशिक्षण शिबिराचा शुभारंभ सोमवार दि.६ ला नियोजनभवनात झाला. जनगणनेच्या कार्यासाठी तीन हजाराहून अधिक मनुष्यबळ लागणार असून, त्यानुसार नियुक्त्या करण्यात आल्या आहेत, तसेच प्रशिक्षण सत्रांना प्रारंभ झाला आहे.

जनगणना संचालनालय महाराष्ट्र व जिल्हाधिकारी तथा प्रधान जनगणना अधिकारी अकोला यांचे संयुक्त विद्यमाने जनगणना २०२७ क्षेत्रीय प्रशिक्षक यांच्या प्रशिक्षण शिबिराचा शुभारंभ झाला. निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा जनगणना अधिकारी गजेंद्र मालठाणे, जिल्हा माहितीविज्ञान अधिकारी अनिल चिंचोले,तहसीलदार तथा मास्टर ट्रेनर वैभव




फरतारे उपायुक्त प्रशासन मनपा तथा मास्टर ट्रेनर दिलीप जाधव, अधीक्षक श्याम धनमने यांच्या आदी उपस्थित होते. मास्टर ट्रेनरकडून क्षेत्रीय प्रशिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षणानंतर क्षेत्रीय प्रशिक्षक हे तालुक्याच्या ठिकाणी प्रगणक व पर्यवेक्षकांना प्रशिक्षण देणार आहेत. तालुका प्रशिक्षण सत्रे २७ एप्रिल ते ८ दरम्यान होतील. जिल्ह्यातील सर्व तालुके, नगरपरिषद, नगरपंचायत क्षेत्रातील जनगणनेसाठी २ हजार ६४६ प्रगणक, तसेच ४४४ पर्यवेक्षक काम करतील.

# देवणी तालुक्यातील 54 गावांची अंतिम पैसेवारी 47 पैशांवर; एकाही गावाने 50 पैसे ओलांडले नाहीत

**दैनिक युवक आधार**

**देवणी तालुका प्रतिनिधी/ पांडुरंग कदम** : देवणी तालुक्यातील देवणी, वलांडी बोरोळ. तीन मंडळ विभागांतील एकूण 54 गावांचा खरीप व रब्बी हंगाम 2025-26 साठीचा अंतिम पैसेवारी अहवाल जाहीर करण्यात आला असून, संपूर्ण तालुक्याची सरासरी अंतिम पैसेवारी 47 पैशांवर नोंदविण्यात आली असून तसे शासनास कळवले असल्याचे तहसील तहसील कार्यालयातून सांगितले. विशेष म्हणजे, या 54 गावांपैकी एकाही गावाने 50 पैशांपेक्षा जास्त पैसेवारी गाठलेली नाही. तालुक्यात एकूण लागवड क्षेत्र 36,719 हेक्टर असून त्यापैकी 35,214 हेक्टर क्षेत्रावर पेरणी करण्यात आली आहे, तर 1,505 हेक्टर क्षेत्र पडीक राहिले आहे. या आकडेवारीवरून तालुक्यातील शेती उत्पादनावर प्रतिकूल परिस्थितीचा स्पष्ट परिणाम झाल्याचे दिसून येते.

दरम्यान, या परिस्थितीत शेतकऱ्यांना पीक विमा मिळण्यासंदर्भात महत्त्वाची बाब समोर आली आहे.




तालुक्यातील प्रधानमंत्री मंत्री पीक विमा योजना ICICI Lombard General Insurance या कंपनीमार्फत राबविण्यात येत असून, अंतिम पैसेवारी 50 पैशांखाली गेल्यामुळे शेतकऱ्यांना विमा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. यासोबतच अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीसाठी शासनाकडून स्वतंत्र अनुदान दिले जाते, आणि त्या अनुदानाचा पीक विम्याशी कोणताही संबंध नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

तज्ज्ञांच्या मते, कमी पैसेवारीमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान मोठ्या प्रमाणात झाले असून, शासनाने तत्काळ मदत व भरपाई देण्याची गरज आहे. तसेच, भविष्यातील हंगामासाठी शाश्वत शेती पद्धती, पाणी व्यवस्थापन आणि हवामान बदलाचा विचार करून नियोजन करण्याची आवश्यकता अधोरेखित होत आहे. प्रशासनाकडूनही या परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आवश्यक ती कार्यवाही करण्याचे संकेत देण्यात आले आहेत.

# आईच्या मायेची ओढ जिंकली! नांदूरमधमेश्वरमध्ये बिबट्याच्या बछड्यांचे आईशी हृदयस्पर्शी पुनर्मिलन

## वनविभागाची तत्परता आणि ग्रामस्थांचे सहकार्य; संभाव्य संघर्ष टळला

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडांगे/निफाड तालुका प्रतिनिधी :** निफाड तालुक्यातील नांदूरमधमेश्वर परिसरात बिबट्या-मानव संघर्षाच्या घटनांदरम्यान एक दिलासा देणारी घटना समोर आली आहे. वनविभागाच्या सतर्कतेमुळे आणि स्थानिकांच्या सहकार्यामुळे बिबट्याच्या तीन बछड्यांचे त्यांच्या आईशी यशस्वी आणि हृदयस्पर्शी पुनर्मिलन करण्यात आले.

धारणगाव रस्त्यालगत गट क्रमांक ६२८ मधील शेतकरी रामदास यशवंत सोनवणे यांच्या उसाच्या शेतात ऊस तोडणीदरम्यान मजुरांना बिबट्याचे अतिशय लहान बछडे आढळून आले. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन सोनवणे यांनी तात्काळ वनविभागाला माहिती दिली. तसेच गावचे पोलिस पाटील गोरखनाथ डांगळे यांनाही कळविण्यात आले.

माहिती मिळताच वनपरिक्षेत्र अधिकारी



राहुल घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली वनविभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. मनमाडचे वनपाल जयप्रकाश शिरसाठ व विंचूरचे वनरक्षक विजय दोंदे यांनी पाहणी करून बछडे सुरक्षित असल्याची खात्री केली. बछड्यांवर मानवी हस्तक्षेप टाळण्यासाठी त्यांना त्याच ठिकाणी सुरक्षित ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला, जेणेकरून मादी बिबट्या स्वतः येऊन त्यांना घेऊन जाईल.

या मोहिमेत निफाडच्या आधुनिक पथकातील भारत माळी, सागर दुसिंग, विजय माळी, शरद चांदोरे, सादिक शेख, काशिनाथ माळी, वैभव दौंड आणि मयूर गांगुर्डे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. पथकाने रात्रभर देखरेख ठेवत परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे व सुरक्षा व्यवस्था केली.

अखेर वनविभागाच्या प्रयत्नांना यश आले आणि रात्रीच्या सुमारास मादी बिबट्या शेतात येऊन आपल्या तिन्ही बछड्यांना सुरक्षितपणे घेऊन नैसर्गिक अधिवासात निघून गेली. या यशस्वी पुनर्मिलनामुळे संभाव्य मानव-वन्यजीव संघर्ष टळला असून वन्यजीव संरक्षणाचा आदर्श नमुना निफाड तालुक्यात पाहायला मिळाला आहे.

दरम्यान, परिसरात बिबट्याचा वावर असल्याने शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र वनविभागाच्या तत्परतेमुळे परिस्थिती नियंत्रणात राहिली. नागरिकांनीही संयम राखून प्रशासनाला सहकार्य केल्याचे दिसून आले.ही घटना मानव आणि वन्यजीव यांच्यातील सहअस्तित्वाचा सकारात्मक संदेश देणारी ठरली आहे.

# गंगनमाळ येथे साखरपुड्यातील अनाठायी खर्चाला आळा

## आहेर म्हणून कपड्यांऐवजी नवरीच्या वडिलांना सुपुर्द केली आर्थिक मदत

**दैनिक युवक आधार**

**उमरखेड तालुका प्रतिनिधी /राजू गायकवाड(मोहदरी) :** लग्नापूर्वी होणाऱ्या साखरपुडा कार्यक्रमात मोठ्या प्रमाणात कपड्यांच्या स्वरूपात आहेर देण्याची जुनी प्रथा आहे. मात्र, उमरखेड तालुक्यातील गंगनमाळ येथे नारायण देवतळे यांच्या मुलीच्या सारखंपुड्यात या परंपरेला छेद देत एक सामाजिक आदर्श निर्माण करण्यात आला आहे. कार्यक्रमात कपड्यांवर होणारा अनावश्यक खर्च टाळून पाहुण्यांनी नवरीच्या



वडिलांना आर्थिक स्वरूपात मदत सुपुर्द केली आहे.साधारणपणे अशा कार्यक्रमांमध्ये नातेवाईक आणि मित्रमंडळींकडून मोठ्या प्रमाणात कपड्यांचा आहेर केला जातो. अनेकदा हे कपडे उपयोगात येत नाहीत किंवा पडून राहतात. हीच बाब लक्षात घेऊन, गंगनमाळ येथील ग्रामस्थांनी आणि नातेवाईकांनी एक नवा पायंडा पाडला. कपड्यांच्या रूपाने खर्च करण्यापेक्षा तीच रक्कम रोख स्वरूपात दिल्यास मुलीच्या लग्नासाठी वडिलांना त्याचा मोठा आधार मिळेल या विचाराने सर्वांनी पुढाकार घेतला.आजच्या काळात लग्नसमारंभात होणारी पैशांची उधळपट्टी आणि अवाजवी खर्च यामुळे अनेक मध्यमवर्गीय कुटुंबे कर्जबाजारी होतात. अशा परिस्थितीत गंगनमाळ येथील नागरिकांनी दाखवलेली ही समजदारी अत्यंत मोलाची ठरत आहे. 'आहेर' हा केवळ उपचार न राहता तो गरजू बापास आधार देणारा ठरावा, हा संदेश या निमित्ताने समाजात गेला आहे. या उपक्रमाचे परिसरातून मोठे कौतुक होत असून, इतर गावांनीही अशाच प्रकारे अनावश्यक खर्च टाळून सामाजिक बांधिलकी जपावी, अशी भावना व्यक्त केली जात आहे यावेळी माजी पंचायत समिती सदस्य गजानन फोफसे, हर्षी येथील सरपंच गजानन टारफे, अनिल इंगळे, शंकर इंगळे, गजानन सातपुते, संदीप आढाव,केशव चिरंगे,श्रीकांत मारकड, माधव चिरंगे, रवी नांदे सह गावकरी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# गणेशोत्सव व नवरात्रोत्सव काळात सेवा दिलेल्या सुरक्षारक्षकांना प्राधान्याने सामावून घेण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** रायगड जिल्हा सुरक्षारक्षक मंडळाकडून गणेशोत्सव आणि नवरात्र उत्सव काळात तात्पुरती सेवा दिलेल्या सुरक्षारक्षकांना पनवेल महापालिकेच्या वाढीव सुरक्षा रक्षक मागणीत प्रथम प्राधान्याने सामावून घेण्याची मागणी महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक श्रम कामगार युनियनचे सरचिटणीस विनायक गांधी यांनी पालिका आयुक्त यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्र तसेच सिडको कार्यक्षेत्रामध्ये 2024-2025 रोजीच्या गणेशोत्सव आणि नवरात्रोत्सव काळात सिडको मार्फत वाहतूक नियंत्रण पोलीस खाते अंतर्गत दोन ते तीन महिने रस्त्यावरील वाहनांच्या वाहतूक कोंडी व नियंत्रण ठेवण्यासाठी वाहतूक पोलिसांना मदतनीस म्हणून रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाकडून सुरक्षा रक्षकांनी काम केले. यावेळेस सुरक्षारक्षकांनी आपले कर्तव्य उत्कृष्टरित्या बजावले. पोलीस कर्मचाऱ्यांच्या खांद्याला खांदा लावून जनतेच्या सेवा सुरक्षा रक्षकांनी केल्या. दोन-तीन महिन्याच्या सेवेचा सुरक्षारक्षकांना हक्काचा वेतन रुपी मोबदला देखील पूर्ण मिळाला नसल्याचे विनायक गांधी यांनी म्हटले आहे. या सुरक्षारक्षकांनी स्वतःच्या गरजेपोटी कोणताही सण, उत्सव न बाळगता तात्पुरत्या स्वरूपाचे प्रामाणिकपणे काम हाताळले. त्यानंतर आजता गायत त्यांना कोठेही कामासाठी नियुक्ती न मिळाल्याने ते कामाच्या प्रतीक्षेत आहेत. तरी महानगरपालिकेकडून वाढीव सुरक्षारक्षकाची मागणी सुरक्षारक्षक मंडळाकडे केल्यास प्रथम प्राधान्याने या सुरक्षारक्षकांना संधी देण्यात यावी अशी मागणी रायगड जिल्हा सरचिटणीस विनायक गांधी यांनी आयुक्त, महापौर, उपमहापौर यांच्याकडे पत्राद्वारे केली.

# हर.. हर.. महादेव, भक्तांना दर्शन देऊन श्री जोगेश्वरीमाता पालखी 83 तासानंतर मंदिरात

**दैनिक युवक आधार**

**नागोठणे प्रतिनिधी :** नागोठणे शहाराची ग्रामदैवता श्री. जोगेश्वरी माता व भैरवनाथ महाराज यांची पालखी उत्सव शुक्रवार 03 एप्रिल रोजी सकाळी 10.00 वा. जोगेश्वरी मंदिरातून निघून संपूर्ण शहरात चार दिवस तीन रात्र असे साधारण 83 तास अहोरात्र फिरून पालखीचे सोमवार 06 एप्रिल रोजी रात्री 9.30 वा.च्या दरम्यान भक्तांना दर्शन देऊन मंदिरात आगमन झाले.यावेळी खा. सुनील तटकरे, रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर,जि.प. आरोग्य व शिक्षण सभापती वैकुंठ पाटील,जि.प.सदस्य सुमित काते यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी पालखीचे दर्शन घेतले.

नागोठणे शहराची ग्रामदैवता श्री. जोगेश्वरी माता व भैरवनाथ महाराजांची चैत्र पौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी साजरा होणारा पालखी सोहळा साजरा करण्यात येतो. ठरल्यानुसार पालखी शुक्रवार 03 एप्रिल रोजी सकाळी 10.00 वा. जोगेश्वरी ट्रस्टचे अध्यक्ष नरेंद्र जैन,विश्वस्त दिलीप टके, देवीचे वतनदार व मानकरी मधुकर पोवळे,राजेश पोवळे, उत्सव कमिटीचे अध्यक्ष चंद्रकांत ताडकर यांच्यासह ट्रस्ट व उत्सव कमिटीचे सर्व पदाधिकारी-सदस्य,ग्रामस्थ व भक्तगणांच्या उपस्थितीत देवीचे भक्त मधुकर पोवळे यांच्या हस्ते विधिवत पुजा करून देवीचे मुखवटे सजवलेल्या पालखीत विराजमान करण्यात आले. त्यानंतर फटाक्यांच्या आताषबाजी, ढोल ताशांच्या गजरात,'श्री. जोगेश्वरी माते की जय,भैरवनाथ महाराज की जय'',हर हर महादेवच्या जयघोषात, गोंधळी, वारकरी भजन मंडळ तसेच




हजारो भक्तगणांच्या साथीने पालखी शहरामध्ये भक्तांना दर्शन देण्यासाठी मार्गस्थ झाली.रात्रभर फिरणाऱ्या पालखीसाठी उत्तम प्रकारे जनरेटर व लाईटची तसेच बाहेर गावावरून आलेल्या भाविकांसाठी भोजनाचीही व्यवस्था करण्यात आली होती. शहरातील विविध भागातील भक्तांना दर्शन देऊन चार दिवस तीन रात्र असे जवळ जवळ 83 तासांनी सोमवार 06 एप्रिल रोजी रात्री 09.30 वा. च्या दरम्यान मोठ्या भक्तिभावाने मंदिरात आगमन झाले. पालखीच्या आगमनानंतर मंदिरात उत्सव कमिटीतर्फे पालखी सोहळयास सहभागी झालेले सर्व ढोल-ताशा पथक, गोंधळी,वारकरी संप्रदाय तसेच सहकार्य करणारे पोलिस स्टेशन, ग्रामपंचायत,पत्रकार,देणगीदार तसेच इतर सहकार्य लाभलेल्याचे ट्रस्ट सचिव भाई टके,उत्सव कमिटी अध्यक्ष चंद्रकांत ताडकर तसेच इतर मान्यवर व कमिटी सदस्यांनी श्रीफळ व प्रसाद देऊन आभार मानले. सदरील पालखी उत्सव सोहळ्यात कोणताही अनुचित प्रकार होऊ नये यासाठी सहा.पो.नि. सचिन कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पुरेसा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

पालखी निमित्त महापूजा व विद्युत रोषणाई - पालखी सोहळा निमित्त गुरुवार 02 एप्रिल रोजी मंदिरात सत्यनारायणाची महापूजेचे आयोजन करण्यात आले होते. या पालखी सोहळ्यानिमित्त दर वर्षी प्रमाणे या वर्षीही ग्रामस्थ मंडळ, खडकआळी यांनी देवीची काठी सजवून मंदिरासमोर उभी केली. पालखी निमित्ताने जोगेश्वरी मंदिर,मरीआई मंदिर, गणपति मंदिर तसेच मंदिराच्या परिसरातील तीन तळी व सभोवताली असलेल्या झाडांवर आकर्षक अशी विद्युत रोषणाई करण्यात आली होती.

उद्योगधंद्यासाठी बाहेरगावी गेलेले नागोठणेकर व माहेर वाशिण यांची उपस्थितीत - शहरातील ग्रामपंचायत,बंगलेआळी, पोलिस ठाणे, खालची आळी, छत्रपती शिवाजी महाराज चौ, दोन्ही कोळीवाडे, छत्रपती शिवाजी पेठ, गांधी चौक, के.एम.जी.विभाग, प्रभूआळी, आंगर आळी, जोगेश्वरी नगर, रामनगर, बाळासाहेब ठाकरे नगर तसेच खडकआळी परिसरातील आपल्या भक्तांनी पालखीचे स्वागत घरासमोर मंडप, पताका, विद्युत रोषणाई,रांगोळी काढून, वाजत-गाजत, भक्तिभावाने पुजा-अर्चा करून तसेच आलेल्या भाविकांना चहा-नाश्ता व थंड पेय देवून केले. यावेळी उद्योगधंद्यासाठी बाहेरगावी गेलेले नागोठणेकर व माहेरवाशींनी तसेच परिसरातील भक्तगण मोठ्या संख्येने पालखी सोहळ्यात सहभागी झाले होते.

# अलिबाग-वरसोली किनाऱ्यावर रात्री स्टंटबाजीला सरकारी पाठबळ? स्थानिकांच्या सुरक्षेचा प्रश्न उपस्थित

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे /अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी** : अलिबाग आणि वरसोली समुद्रकिनाऱ्यावर रात्रीच्या वेळी चारचाकी गाड्यांच्या स्टंटबाजीला आता खुलेआम 'ग्रीन सिग्नल' मिळाल्यासारखे चित्र दिसत आहे. स्थानिक नागरिकांसाठी असलेली पार्किंगची सोय आता बाहेरून येणाऱ्या पर्यटकांसाठी 'एन्जॉयमेंट झोन' बनली असून, स्टंटबाजीला कोणतीही अटकाव नसल्याने जनतेत संतापाची लहर उसळली आहे. नागाव, रेवदंडा किनाऱ्यांवरही ही बेकायदा वादळ सुरू असून, यामागे शासकीय यंत्रणेची संलग्नता असल्याची चर्चा जोर धरत आहे. पर्यटक वाढवण्याच्या नावाखाली स्थानिकांच्या सुरक्षेचा बोजा कोण घेणार? रात्रीच्या काळोखात चारचाकी गाड्या एकमेकांवर आपटत स्टंट करताना अपघात झाल्यास जबाबदारी कोणाची? असा थेट प्रश्न उपस्थित करत स्थानिक नागरिकांनी शासनाच्या डोळ्यात अंगुली ठेवली आहे. "ही सोय फक्त पर्यटकांसाठी का? आमच्या मुलांच्या जीवाची किंमत काय?" असे सवाल करत अलिबागच्या रहिवासी संतप्त झाले आहेत. एका अपघाताची शक्यता नाकारता येत नाही; गाड्या वेगाने धावताना एकमेकांवर आपटल्यास जीवितहानी होण्याची भीती व्यक्त होत आहे. तरीही पोलिस, महसूल आणि पर्यावरण विभाग गप्प का? असा संशय वाढत आहे.स्टंटबाजीला 'परवानगी' का? गुप्त करारांचा संशय पर्यटक वाढवण्याच्या



नावाने अलिबाग तालुक्यातील किनारपट्टी 'स्टंट अरिना' बनली आहे. स्थानिकांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करून शासकीय यंत्रणा पाठीशी घालत असल्याचा आरोप होत आहे. "बंद दाराआड पैसे घेऊन डोळे झाकली जातील का?" अशी चर्चा बाजारात, चहा हट्ट्यांवर रंगत आहे. रेवदंडा आणि नागाव किनाऱ्यावर रात्री १० नंतर पार्किंग आणि स्टंटबाजीला कोणतीही अडचण नाही. पर्यटन विभागाच्या 'विकास' धोरणांतर्गत हे चालत असल्याचे सांगितले जाते, पण स्थानिकांच्या हक्कांचा विचार कोण करणार?

स्थानिक रहिवासी प्रकाश पाटील म्हणाले, "पर्यटकांना मजा यावी म्हणून आमच्या किनाऱ्यावर धोका का? एकदा अपघात झाला तर जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक काय सांगतील?" दुसऱ्या रहिवाशी सुनीता म्हात्रे यांनी सांगितले, "रात्रीच्या स्टंटमुळे लहान मुले, महिलांना भीती वाटते. शासनाने तात्काळ कारवाई करावी." पर्यावरण विभागाकडूनही किनाऱ्यावरील बेकायदा उपक्रमांना आळा घालण्यात अपयश दिसत आहे.

अपघाताची भीती: जबाबदारी कोण घेईल? स्टंटबाजी दरम्यान गाड्या एकमेकांवर आपटल्यास काय होईल? अपघातग्रस्तांच्या कुटुंबीयांना न्याय मिळेल का? हे प्रश्न शासनासमोर उभे केले जात आहेत. जिल्हा प्रशासनाने तातडीने पार्किंगवर बंदी घालून स्टंटबाजी रोखावी,

इअन्यथा जनआंदोलनाचा इशारा स्थानिकांनी दिला आहे. पर्यटन वाढवण्याच्या नावाखाली स्थानिकांच्या सुरक्षेचा बोजा लादला जाणार नाही, असा निर्धार व्यक्त होत आहे.

या प्रकरणाची अधिक चौकशी करून कारवाई करण्याची मागणी होत असून, शासनाने कान टोचले जाण्यापूर्वी जागे व्हावे, अशी अपेक्षा आहे.

# सिन्नर येथील राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत शिवछत्रपती पुरस्कार विजेते प्रमोद म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली रायगडचा 'युवा जोश' चमकला ७ वर्षानंतर गाठली उपांत्य फेरी!

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने नाशिक जिल्हा कबड्डी असोसिएशन आणि युवा मंच सिन्नर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ७३ व्या वरिष्ठ पुरुष व महिला गट राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत रायगड जिल्ह्याच्या पुरुष संघाने ऐतिहासिक कामगिरी केली आहे. मुख्य प्रशिक्षक आणि शिवछत्रपती पुरस्कार विजेते श्री. प्रमोद म्हात्रे यांच्या अचूक रणनीती आणि मार्गदर्शनामुळे रायगडने तब्बल ७ वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर उपांत्य फेरीत धडक मारत स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावला.

या स्पर्धेचे उद्घाटन राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण, जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे 'महाराष्ट्र केसरी' कुस्तीपटू हर्षवर्धन सदगीर यांची विशेष उपस्थिती खेळाडूंसाठी प्रेरणादायी ठरली. सिन्नर येथील क्रीडा नगरीत सहा मॅटवर या स्पर्धेचा थरार रंगला होता.रायगडचा यंदाचा संघ हा पूर्णपणे तरुण खेळाडूंनी भरलेला होता. या युवा रक्ताला अनुभवाची जोड देण्यासाठी प्रमोद म्हात्रे यांनी मोलाची भूमिका बजावली. आपल्या प्रदीर्घ अनुभवातून त्यांनी तरुण खेळाडूंना मैदानावर योग्य दिशा दाखवली आणि संघात एक नवी ऊर्जा निर्माण केली. त्यांच्या रणनीतीला खेळाडूंनी मैदानावर उत्तम प्रतिसाद दिला




ज्याचे फलित म्हणजे रायगडला मिळालेले हे यश आहे. या स्पर्धेसाठी रायगड संघाला लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांचे मोलाचे सहकार्य लाभले त्यांच्या मार्गदर्शनाखाली संघाचे सराव शिबिर पार पडले दोन्ही मान्यवरांनी रायगडच्या पुरुष व महिला संघांना खेळाचे किड्स प्रदान करून प्रवासापूर्वी शुभेच्छा दिल्या होत्या.

स्पर्धेच्या पहिल्या दिवशी अवकाळी पावसाने व्यक्ती आणला होता मात्र आयोजकांनी चिखल काढून मॅटची उत्तम व्यवस्था केल्यावर सामने पुन्हा जोमाने सुरू झाली लीग स्टेजमध्ये रायगडने सोलापूर आणि लातूर या बलाढ्य संघाला धूळ चारली मुंबई उपनगर कडून पराभव स्वीकारावा लागला तरी रायगडने उपविजेते म्हणून बाद फेरीत प्रवेश मिळवला. बाद फेरीत रायगडने प्रथम नांदेड वर विजय मिळवला त्यानंतर अतिशय चुरशीच्या झालेल्या क्वार्टर फायनल मध्ये सांगली जिल्हा संघाचा अवघ्या दोन गुणांच्या निसटत्या फरकाने पराभव करत रायगडने सेमी फायनल मध्ये धडक मारली उपांत्य फेरीत अनुभवी अहिल्यानगर (अहमदनगर) संघाकडून पराभव झाला असला तरी रायगडने सात वर्षानंतर ही यश मिळवून सर्वांचे लक्ष वेधून घेतले रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे कार्यवाह चित्रा आस्वाद पाटील आणि एड. आस्वाद पाटील यांनी संघाच्या दैदीप्यमान कामगिरीचे कौतुक केले आहे प्रमोद म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली या तरुण रायगड संघाचे सध्या सर्वत्र अभिमान अभिनंदन होत आहे. युवा खेळाडूंच्या संघात आपल्या प्रदीर्घ अनुभवतो नवी ऊर्जा निर्माण करणारे प्रमोद म्हात्रे यांनी रायगडला ७ वर्षानंतर हे मानाचे स्थान मिळवून दिले. तसेच ४१ वर्षांपुर्वी रायगड जिल्हा संघाने प्रथमच फायनल मारली त्या संघाचे कर्णधार प्रमोद म्हात्रे हे होते.एका खेडेगावातून आलेल्या सुपुत्राच्या मार्गदर्शनाखाली रायगड कबड्डीचा झेंडा पुन्हा एकदा राज्यस्तरावर डौलाने फडकत आहे.

# निफाड मतदार संघात सन २०२५-२६ या वर्षात ५.२८ कोटी आमदार निधी मंजूर - आ. दिलीपराव बनकर

**दैनिक युवक आधार**

**निफाड क्रीडा प्रतिनिधी /विलास गायकवाड** : निफाड विधानसभा मतदार संघात सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात विविध विकास कामांसाठी रक्कम रु.५.२८ कोटी निधी मंजूर झाला असल्याची माहिती आमदार दिलीपराव बनकर यांनी दिली.

एकूण २९ गावांमध्ये सभामंडप, सौर पथदीप, रस्ते, भक्तनिवास, संरक्षण भिंत, सभागृह आदी कामांचा समावेश आहे. यात करंजगांव येथील श्री सटुबाई मंदिर परिसरात ग्रामपंचायतीच्या मोकळया जागेवर सभामंडप बांधणे. (रक्कम रु.१० लक्ष), करंजगांव येथे आदिवासी वस्तीत सौर पथदिप बसविणे. (रक्कम रु.७.५० लक्ष), नैताळे येथील श्री लक्ष्मीबाई माता मंदिर परिसरात (वार्ड क्र.४) ग्रामपंचायतीच्या मोकळ्या जागेवर सभामंडप बांधणे. (रक्कम रु.१० लक्ष) , श्रीरामनगर (कोळवाडी) येथे श्री महादेव मंदिर परिसरात ग्रामपंचायतीच्या मोकळया जागेवर सभामंडप बांधणे. (रक्कम रु.१० लक्ष), आहेरगाव येथील श्री दातावली महाराज मंदिर परिसरात ग्रामपंचायतीच्या मोकळया जागेवर सभामंडप बांधणे. (रक्कम रु.१० लक्ष), चांदोरी येथे मेंढवाडा परिसरात ग्रामपंचायतीच्या मोकळया जागेवर सभामंडप बांधणे. (रक्कम रु.१० लक्ष), चापडगाव येथील श्री हनुमान मंदिर व श्री खंडेराव मंदिर परिसरात ग्रामपंचायतीच्या मोकळया जागेवर भक्त निवास बांधणे. (रक्कम रु.१५ लक्ष), पालखेड प्राथमिक आरोग्य उपकेंद्राला संरक्षण भिंत बांधणे. (रक्कम रु.१० लक्ष), पिंपळस कारखाना येथे श्री नर्मदेश्वर महादेव मंदिर परिसरात ग्रामपंचायतीच्या मोकळया जागेवर सभामंडप बांधणे. (रक्कम रु.१५ लक्ष), शिंगवे ग्रामपंचायतीच्या मोकळया जागेवर सभामंडप बांधणे. (रक्कम रु.१० लक्ष), सायखेडा येथील (शिंपी समाज) ग्रामपंचायतीच्या मोकळया जागेवर सभामंडप बांधणे. (रक्कम रु.१० लक्ष), करंजगाव येथील आदिवासी वस्तीतील श्री सप्तशृंगी माता देवस्थान परिसरात सभामंडप बांधणे. (रक्कम रु.१५ लक्ष), कोठुरे येथील आदिवासी वस्तीत सभामंडप बांधणे. (रक्कम रु.१५ लक्ष), कसबे सुकेणे येथील सप्तशृंगी नगर (बारा बंगले) येथे सभामंडप बांधणे. (रक्कम रु.१० लक्ष), वावी ठुशी येथे जेष्ठ नागरीकांसाठी सामाजिक सभागृह बांधणे. (रक्कम रु.१० लक्ष), श्रीरामनगर येथील श्री मारुती देवस्थान परिसरात सभामंडप बांधणे. (रक्कम रु.१० लक्ष), औरंगपुर येथील श्री खंडेराव महाराज मंदिर परिसरामध्ये सभागृह बांधणे. (रक्कम



रु.२५ लक्ष), जळगाव येथील श्री खंडेराव मंदिर परिसरात आदिवासी वस्तीत सभामंडप बांधणे. (रक्कम रु.१० लक्ष), रानवड येथील श्री मारुती मंदिर परिसरात सभामंडप बांधणे. (रक्कम रु.२० लक्ष), रौळस येथील आदिवासी वस्तीत सभामंडप बांधणे. (रक्कम रु.१० लक्ष), कारसुळ येथील जुना रौळस रस्त्याची सुधारणा करणे. भाग -१ (रक्कम रु.२५ लक्ष), कारसुळ येथील जुना रौळस रस्त्याची सुधारणा करणे. भाग -२ (रक्कम रु.२५ लक्ष), सावरगाव येथील श्री खंडेराव महाराज देवस्थान परिसरात सभामंडप बांधणे. (रक्कम रु.१० लक्ष), खानगाव थडी येथील श्री विठ्ठल रुख्मिणी देवस्थान परिसरात सभामंडप बांधणे. (रक्कम रु.१० लक्ष), उंबरखेड येथे मारुती मंदिर देवस्थान परिसरात सभामंडप बांधणे. (रक्कम रु.१५ लक्ष), कसबे सुकेणे येथील रावसाहेब नगर अंतर्गत रस्ते मजबुतीकरण करणे. (रक्कम रु.२५ लक्ष), कुंदेवाडी येथील घेगडे नगरमधील ग्रामपंचायतीच्या मोकळया जागेत सभामंडप बांधणे. (रक्कम रु.१५ लक्ष), जळगाव येथील गाव अंतर्गत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. (रक्कम रु.१५ लक्ष), दारणासांगवी येथील श्री खंडेराव महाराज देवस्थान परिसरात सभामंडप बांधणे. (रक्कम रु.१५ लक्ष), शिंपीटाकळी येथील ग्रामा २२४ ते लोखंडे वस्ती रस्त्याची सुधारणा करणे. (रक्कम रु.१० लक्ष), शिवरे गाव अंतर्गत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. (रक्कम रु.२५ लक्ष), भेंडाळी येथील गोसावी बाबा देवस्थान परिसरात सभामंडप बांधणे. (रक्कम रु.१० लक्ष), लोणवाडी येथील लोणवाडी – शिरवाडे वणी रस्त्याची सुधारणा करणे. (रक्कम रु.२५ लक्ष), पिंपळगाव बसवंत येथील त्रिमूर्ती कॉलनी मधील नगरपरिषदेच्या मोकळया जागेत सभामंडप बांधणे. (रक्कम रु.२० लक्ष), पिंपळगाव बसवंत येथील रा मा क्र.३ ते महाले वस्ती (घागरनाला) रस्त्याची सुधारणा करणे. (रक्कम रु.१५ लक्ष), पिंपळगाव बसवंत येथील शांतीनगर मधील श्री दुर्गा माता मंदिर परिसरात सभामंडप बांधणे. (रक्कम रु.१५ लक्ष), ओझर मिग येथील दिक्षी सुकेणे रोडलगत असलेल्या गंगापूर कॅनॉल/ डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर, एरंडवाडी, रामजीनगर रोडवर स्ट्रीट लाईट बसविणे. (रक्कम रु.१० लक्ष) या कामांचा समावेश आहे. सदर कामे मंजुरी करिता सहकार्य केल्याबद्दल मा.जिल्हाधिकारी साहेबव सबंधित अधिकारी यांचे निफाड तालुक्यातील जनतेच्या वतीने आमदार दिलीपराव बनकर यांनी आभार मानले.

# अडोळीतील जनजागृतीला जोरदार प्रतिसाद ; 'समाधान शिबिरा'साठी प्रशासन सज्ज !

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे/वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : अडोळी (वाशिम)केकत उमरा येथे दि. १० एप्रिल रोजी आयोजित करण्यात आलेल्या समाधान (राजस्वी) शिबिराच्या पार्श्वभूमीवर अडोळी येथे दि. ६ एप्रिल रोजी सकाळी १०:०० वाजता ग्रामपंचायत कार्यालयात भव्य जनजागृती कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमामुळे परिसरातील शेतकरी व नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी नोडल ऑफिसर तथा नायब तहसीलदार आडे, मंडळ अधिकारी करवते, महसूल अधिकारी संध्या मार्कंड, ग्रामपंचायत अधिकारी अरविंद पडघन यांची प्रमुख उपस्थिती होती.

अडोळी येथे महसूल अधिकारी म्हणून सेवा बजावलेले आडे यांची नुकतीच नायब तहसीलदार पदावर पदोन्नती झाल्याने ग्रामपंचायतीच्या वतीने त्यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

यानंतर उपस्थित मान्यवरांनी समाधान शिबिराबाबत सविस्तर माहिती देत गावातील शेतकरी व नागरिकांनी आपल्या शेतीसंबंधी



तसेच इतर विविध समस्या लेखी स्वरूपात मांडाव्यात, असे आवाहन केले. महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार नाव दुरुस्ती, क्षेत्रफळ दुरुस्ती यांसह सुमारे १५ प्रकारच्या महसुली त्रुटींचे निराकरण शिबिरात तात्काळ करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

केकत उमरा मंडळातील तसेच अडोळी परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने दि. १० एप्रिल रोजी सकाळी १० वाजता केकत उमरा येथे उपस्थित राहावे, असे आवाहन नायब तहसीलदार आडे यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजकुमार पडघान यांनी केले, तर आभार प्रदर्शन संगणक ऑपरेटर रवि इढोळे यांनी मानले. कार्यक्रमास उपसरपंच भगवान इढोळे, परमेश्वर इढोळे, श्रीराम इढोळे यांच्यासह अनेक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सह्याद्रीच्या कड्यांतून जिद्दीची झेप! आदगावची 'लेक' आता पालघरची 'रक्षक'

## पोलीस भरतीत मानसी पाटीलचे देदीप्यमान यश ; श्रीवर्धनच्या दुर्गम भागातील संघर्षाची प्रेरणादायी यशोगाथा !

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन वार्ताहर :** श्रीवर्धन तालुक्यातील डोंगरदऱ्यांच्या कुशीत वसलेलं गाव... हाताला येईल ते काम करून कुटुंबाचा गाडा ओढणारे आई-वडील... आणि डोळ्यात खाकी वर्दीचं स्वप्न पाहणारी एक जिद्दी तरुणी! हे वर्णन आहे श्रीवर्धन तालुक्यातील शेवटच्या टोकावर असलेल्या आदगाव कुणबीवाडी येथील मानसी निलेश पाटील हिचे. मानसीने आपल्या कष्टाच्या जोरावर 'खाकी' वर्दीला गवसणी घातली असून, तिची निवड पालघर पोलीस दलात झाली आहे. तिच्या या यशाने संपूर्ण श्रीवर्धन तालुक्यात आनंदाची लाट उसळली आहे.

संघर्षातून यशाचा मार्ग: प्रहार अकॅडमीत तीन वर्षे खडतर तपश्चर्या

मानसीचा हा प्रवास मुळीच सोपा नव्हता. दुर्गम भागातून मुंबईच्या उपनगरातील नालासोपारा गाठणे आणि तिथे 'प्रहार अकॅडमी' मध्ये सलग तीन वर्षे घाम गाळणे, ही तिची मोठी तपश्चर्या ठरली. पहाटेचा सराव असो किंवा रात्रीचा अभ्यास, मानसीने कधीच थकवा जाणवू दिला नाही. तीन वर्षांच्या या प्रवासात अनेकदा अपयशाचे डोंगर समोर आले, पण मानसीने आपली 'जिद्द' ढळू दिली नाही.

बळ देणारे हात: आई-वडिलांचे योगदान



एका सर्वसाधारण कुटुंबात वाढलेल्या मानसीच्या मागे तिचे आई-वडील खंबीरपणे उभे राहिले. प्रतिकूल आर्थिक परिस्थिती असतानाही त्यांनी मुलीच्या शिक्षणात आणि सरावात कोणतीही कसर पडू दिली नाही. "माझ्या आई-वडिलांचे कष्ट आणि त्यांनी माझ्यावर दाखवलेला विश्वास यामुळेच मी आज इथपर्यंत पोहोचू शकले," अशा शब्दांत मानसीने आपल्या भावना व्यक्त केल्या.

बातमीची वैशिष्ट्ये:

* गावचा अभिमान: आदगाव कुणबीवाडी सारख्या दुर्गम गावाला मानसीने ओळख मिळवून दिली.

* पालघर पोलीस दलात नियुक्ती: आता मानसी पालघर जिल्ह्याच्या सुरक्षेची धुरा सांभाळणार आहे.

* मुलींसाठी प्रेरणा: ग्रामीण भागातील मुलींसाठी ती 'आयडॉल' ठरली आहे.

दुर्गम भागातील मुलींना नवी दिशा

ग्रामीण भागात आजही मुलींच्या शिक्षणासाठी आणि करिअरसाठी अनेक मर्यादा येतात. मात्र, मानसीने या सर्व मर्यादांना मोडीत काढत एक नवा आदर्श घालून दिला आहे. तिच्या या यशामुळे केवळ आदगावच नव्हे, तर संपूर्ण जिल्ह्यातील दुर्गम भागातील मुलींना "आपणही करू शकतो" हा आत्मविश्वास मिळाला आहे.

"परिस्थितीला दोष देण्यापेक्षा, परिस्थितीवर मात करण्याची ताकद आपल्या मनगटात असावी लागते. मानसीने ते आज सिद्ध करून दाखवले आहे. तिच्या यशाने कुणबीवाडीची शान वाढली आहे!"

— ग्रामस्थ, आदगाव.

शुभेच्छांचा वर्षाव:

मानसीच्या या यशाची बातमी समजताच श्रीवर्धन तालुक्यातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था आणि ग्रामस्थांनी मानसीचे आणि तिच्या कुटुंबाचे कौतुक केले असून, तिच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

मानसीची यशोगाथा सांगते - "स्वप्न पाहणाऱ्यांच्या मेहनतीला जेव्हा जिद्दीची जोड मिळते, तेव्हा डोंगराएवढे यशही पायाशी लोळण घेते!"

---

## कार्यकर्ता हाच पक्षाचा खरा कणा – नितिन गडकरी ; भाजपचा ४६ वा स्थापना दिवस उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधि राहुल मडावी नागपूर:** भारतीय जनता पक्षाच्या ४६ व्या स्थापना दिनानिमित्त आज, सोमवार ६ एप्रिल रोजी सकाळी ८:३० वाजता भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हा सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला असून केंद्रीय मंत्री ना. नितीनजी गडकरी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी उपस्थितांना संबोधित करताना नितीनजी गडकरी यांनी सांगितले की, भारतीय जनता पक्षाची आजवरची प्रगती ही कार्यकर्त्यांच्या कष्टाचे फळ असून कार्यकर्ता हाच पक्षाचा खरा कणा आहे. यावेळी त्यांनी उपस्थित सर्व कार्यकर्त्यांना आणि पदाधिकाऱ्यांना स्थापना दिनाच्या शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी भाजप नागपूर शहर अध्यक्ष दयाशंकर तिवारी यांनी भूषविले.त्यांनी आपल्या प्रास्ताविकातून जनसंघापासून सुरू झालेला हा प्रवास आज जगातील




सर्वात मोठा राजकीय पक्ष म्हणून कसा प्रस्थापित झाला,याची माहिती देत भारतीय जनता पक्षाचा ४६ वर्षांचा गौरवशाली इतिहास कार्यकर्त्यांसमोर मांडला. याप्रसंगी मंचावर महापौर नितातार्ई ठाकरे, आमदार कृष्णा खोपडे, आमदार प्रवीण दटके, संघटन मंत्री उपेंद्रजी कोठेकर, माजी आमदार सुधाकर कोहळे,माजी आमदार विकासजी कुंभारे,प्रदेश उपाध्यक्ष संजय भेंडे, प्रदेश मंत्री अर्चनाताई डेहनकर,श्रीकांत जी देशपांडे,राजेश जी बागडी,बंटी कुकडे,जयप्रकाश गुप्ता,सुभाष पारधी, उपमहापौर लिला हाथीबेड स्थाई समिति अध्यक्ष शिवानी दाणी महामंत्री श्रीकांत आगलावे, रितेश गावंडे,मनीषाताई धावडे,संपर्क महामंत्री विष्णू चांगदे,सह संपर्क मंत्री बाल्या बोरकर,या सोहळयाला मंडळ अध्यक्ष,आघाड़ी मोर्चा अध्यक्ष सोबत पक्षाचे पदाधिकारी,नगरसेवक आणि मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यालय मंत्री ब्रजभूषण शुक्ला,सुधीर हिरडे यांनी प्रयत्न केले,कार्यक्रमाचे संचालन रितेश गावंडे यांनी केले तर आभार श्रीकांत आगलावे यांनी मानले सामूहिक राष्ट्रगानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## शिक्षणाचा वेळ सकाळी दहा ते दुपारी चार तर दारुचा वेळ सकाळी आठ ते रात्री दहा

**दैनिक युवक आधार**

**देगलूर प्रतिनिधी :** मागील काही वर्षांपासून ग्रामीण भागातील शिक्षण अधोगतीला येत असून अनेक विद्यार्थी चुकीच्या मार्गावर जात आहेत.इ.स.१९९० च्या काळात ग्रामीण भागातील शिक्षण एक नंबरवर होता आणि त्या काळात गोरगरीब विद्यार्थ्यांसाठी शासनाकडून वस्तीग्रहाची सोय होती.त्या वस्तीग्रहात शिक्षणाच्या सर्व प्रकारच्या सुखसुविधा उपलब्ध होत्या अनं जिल्हा परिषद शाळा सुद्धा एक नंबरवर होत्या. त्या जिल्हा परिषद शाळेत एकापेक्षा एक सरस कामगिरी करणारे शिक्षक, विज्ञान विभागासाठी सुसज्य प्रयोगशाळा,खो खो खेळण्यासाठी,कबड्डी,हॉलीबॉल अशा अनेक प्रकारच्या खेळ खेळण्यासाठी मैदान अशा सर्व प्रकारच्या सुखसुविधा उपलब्ध करून देण्यात आले होते.अशा काळात विजपुरवठ्याचा तुटवडा,शिक्षणासाठी लागणाऱ्या वस्तू वेळेवर न मिळणे,वह्या पुस्तकांचा तुटवडा अशा अनेक संकटांना सामोरे जात फक्त शिक्षणाला महत्व दिले जात होते.

परंतू आजघडीला ग्रामीण भागात शिक्षणाचा बट्ट्याबोळ झाला असून,जिल्हा परिषद शाळा संकटात सापडले आहेत तर पैशाच्या जोरावर खाजगी क्षेत्रातील शिक्षणावर जास्त भर देण्यात येत आहे. अशा परिस्थितीमध्ये गोरगरीब जनतेला खाजगी शिक्षणासाठी वेळेवर आर्थिक मदत मिळत नसल्यामुळे त्यांची मुले चुकीच्या मार्गावर जात असल्याची माहिती प्रशासनाला देऊन सुद्धा त्या विषयाकडे दुर्लक्ष केले जात आहे अन नको त्या गोष्टी हणेगाव परिसरात उपलब्ध करून देणे आवश्यक समजत असल्याची टीका ग्रामीण भागातील जनता करीत आहे.

सद्याची परिस्थिती पाहता ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळा डबघाईला आले असून काही शाळांमध्ये शिक्षकांची भरती प्रक्रिया झाली नसल्यामुळे त्या ठिकाणी विद्यार्थ्यांचा मोठा नुकसान होत आहे,परंतू दारूच्या माध्यमात मात्र प्रशासन सतर्कता बाळगत आहे.एकवेळेस शिक्षणासाठी शिक्षकाची कमतरता असली तरी चालेल मात्र दारूच्या दुकानाची कमतरता भासता कामा नये अशीच परिस्थिती हणेगाव परिसरात झाल्याचे दिसून येत आहे.

या सर्व गोष्टी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले आहेत परंतू त्यांना त्या गोष्टीचा गांभीर्य नाही.आज घडीला शिक्षणाची वेळ सकाळी दहा ते दुपारी चार वाजेपर्यंत असून दारुच्या दुकाला सकाळी आठ ते रात्रीचे दहा वाजेपर्यंत वेळेची मर्यादा असल्यामुळे शिक्षणापेक्षा दारूला महत्व जास्त प्रमाणात दिले जात असल्याची चर्चा सुरू आहे.

---

## क्रेडिट कार्ड मधून एक लाख 39 हजारांची ऑनलाइन फसवणूक

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** क्रेडिट कार्ड मंजूर झाल्याचे सांगून लिंक पाठवली आणि क्रेडिट कार्ड मधून एक लाख 39 हजार रुपयांची ऑनलाईन फसवणूक केल्याप्रकरणी अनोळखी इसमाविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात 2 एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.बबन श्रीपती शिंदे हे कामोठे,, सेक्टर 36 येथे राहत असून त्यांना अनोळखी ईसमाकडून फोन आला. आणि बँकेचे क्रेडिट कार्ड मंजूर झाले असून व्हाट्सअप द्वारे लिंक पाठवतो. ती लिंक उघडून माहिती भरण्यास सांगितले. लिंक मध्ये माहिती भरत असताना त्यांना शंका आल्याने त्यांनी लिंक बंद केली. आणि त्या इसमाचा फोन कट केला. अर्ध्या तासानंतर त्यांना ओटीपी आला. त्यानंतर मोबाईल क्रमांकावर रक्कम वजा झाल्याचे मेसेज आले. त्यांनी बँकेला फोन द्वारे सांगून क्रेडिट कार्ड ब्लॉक केले.

## चाकूचा धाक दाखवून सोन्याची चैन हिसकावली

**दैनिक युवक आधार**


**नवीन पनवेल वार्ताहर :** चाकूचा धाक दाखवून एका वृद्ध महिलेकडील चार ग्राम वजनाची सोन्याची चैन हिसकावून नेल्याप्रकरणी अनोळखी ईसमाविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात एक एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.जानकी टीसी या नवीन पनवेल, सेक्टर 11 येथे राहत असून त्या वॉकिंग करण्यासाठी घराबाहेर गेल्या होत्या. वॉकिंग झाल्यानंतर घरी येत असताना सोसायटीच्या पहिल्या माळयावर आल्या. त्यावेळी सोसायटीच्या जिन्यावरून 25 ते 30 वर्षीय अनोळखी इसम आला. त्याने तोंडाला मास्क आणि चष्मा घातला होता. त्याने चाकूचा धाक दाखवला आणि जानकी टीसी यांच्या गळयातील सोन्याची चैन त्याने हिसकावली. जानकी यांनी चेन पकडली यावेळी काही भाग तोडून घेऊन तो पळून गेला.

## पनवेलमध्ये 'खुशरंग' संगीत महोत्सव दिमाखात संपन्न; रसिक मंत्रमुग्ध

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, पनवेल आणि नादब्रह्म साधना मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेला 'खुशरंग' संगीत महोत्सव शेकडो संगीत रसिकांच्या साक्षीने आणि उत्स्फूर्त प्रतिसादात मोठ्या दिमाखात पार पडला. मार्केट यार्ड येथील सभागृहात सायंकाळपासूनच रसिकांची मोठी उपस्थिती पाहायला मिळाली. शास्त्रीय गायन, भजन आणि कथक नृत्य यांचा सुरेल संगम अनुभवताना रसिक मंत्रमुग्ध झाले. यावेळी नामवंत कलाकारांनी आपल्या प्रभावी सादरीकरणातून सभागृहात सुरांची मैफल रंगवली. प्रत्येक कलाविष्काराला रसिकांनी टाळयांच्या कडकडाटात दाद दिली.

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात झालेल्या या महोत्सवाचा शुभारंभ पं. गिरीश संझगिरी, ह.भ. प. निवृत्तीबुवा चौधरी, पं.मारूती पाटील,पं. उमेश चौधरी, उस्ताद रफात खान नियाजी, नागनाथ पाटील व विनोद तोडेकर यांच्या हस्ते दीप्रज्वलन व सरस्वती पूजनाने झाली. महोत्सवात पहिले पुष्प पं. गिरीश संझगिरी यांनी गुंफले. त्यांनी आपल्या गायनाची सुरुवात राग 'पुरिया धनाश्री' मधील 'अब तो ऋतु मान' हा बडा खयाल तर तीन तालात 'बीत गये जुगवा पिहरवा' हा छोटा खयाल सादर केला. त्यानंतर "ज्ञानीयांचा राजा"या अभंगाने आपल्या गायनाची सांगता केली. कार्यक्रमाचे दुसरे पुष्प पं. महेश



कुलकर्णी यांनी गायनाची सुरुवात राग 'श्री कल्याण' मधील 'अजहून आये' बडा खयाल तर छोटा खयाल 'झननन बाजे पायलीयां' सादर केला. त्यानंतर राग सोहनी मधील छोटा खयालाने आपल्या गायनाची सांगता केली. कार्यक्रमाचे तिसरे पुष्प पं. विनायक नाईक यांच्या संकल्पनेतून साकार केला. गायन, वादन,नृत्य एक अविष्कार हा कार्यक्रम आर्या महाजन, ऋतुजा कुलकर्णी यांचे नृत्य आणि या नृत्याबरोबर विनायक नाईक व सहकाऱ्यांनी तीन तालामध्ये कायदे, तुकडे, रेळे यांचे वादन व जुगलबंदी सादर झाली. कार्यक्रमाचा समारोपही अत्यंत भारदस्त वातावरणात झाला. उस्ताद अस्लम खान यांचे शिष्य पं. उमेश चौधरी यांच्या सुरेल गायनाने झाली. त्यांनी आपल्या गायनाची सुरुवात 'बिहाग' रागातील 'श्रीराम श्रीराम जय जय राम' या बडा खयाल ने तर 'अब तो रट लागी'या छोट्या खयालाने केली.त्यानंतर खमाज रागामध्ये ठुमरी तसेच 'केतकी गुलाब जुही चंपक बन फुली' आणि शेवटी 'वैकुंठीच्या राया' या भैरवीने त्यांनी सांगता केली. त्यांच्या दाणेदार, प्रभावी आवाजाने संपूर्ण सभागृह मंत्रमुग्ध झाले.

सदर कलाकारांना संवादिनी साथ पं. विनायक ललित, स्मिता मनोहर तर तबलासाथ विनायक नाईक, प्रसाद सुतार, महेश कानोळे तर पखवाज सोमदत्त माने व सूरज गोंधळी तसेच नृत्याबरोबर गायन साथ तनुश्री जोग व सुधींद्र बागल यांनी दिली तर सूत्रसंचालन सोपान आढाव यांनी केले. महोत्सव यशस्वी करण्यासाठी कलाकारांसह महोत्सवाचे निमंत्रक ह.भ.प. वसंत पाटील, विनोद तोडेकर, अक्षय चौधरी, अनिल कोळी ,जगदीश म्हात्रे,मच्छींद्र पाटील आणि सहकाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली. या सुरेल मैफलीमुळे पनवेलकर संगीतप्रेमींना अविस्मरणीय असा सांस्कृतिक सोहळा अनुभवता आला. आयोजकांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल सर्व कलाकार, सहवादक आणि उपस्थित रसिकांचे आभार मानले.

## खिशातून रोख रक्कम आणि मोबाईल घेऊन अनोळखी इसम गेला पळून

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** बत्तीस वर्षीय तरुणाच्या हाताला चावा घेऊन आणि धारदार वस्तीने वार करून खिशातून पाच हजार रुपये आणि मोबाईल खेचून पळून गेल्या प्रकरणी अनोळखी ईसमाविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात 3 एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.शेख रोशन शेख चांद हा यवतमाळ येथे राहत असून तो ट्रक मालकासह भिवंडी ठाणे येथे माल भरण्यासाठी आला होता. दोन एप्रिल रोजी ते औरंगाबाद व नागपूर येथे जाण्यासाठी निघाले. पनवेलला जेवण करण्याचे ठरवले. सायंकाळी साडेपाचच्या सुमारास मोबाईल व पाच हजार रुपये घेऊन पनवेल रेल्वे स्टेशन येथे ऑटो रिक्षाने आला. तो रिक्षा पकडण्यासाठी पायी चालत गांधी हॉस्पिटलच्या समोरील कामगार नाका येथे आला. रिक्षात बसत असताना त्याच्या पाठीमागून एक इसम आला आणि त्यांनी त्याच्या खिशातून पैसे काढण्याचा प्रयत्न केला. यावेळी प्रतिकार केला असता त्या अनोळखी इसमाने त्याच्या हाताला चावा घेतला आणि चाकूने वार केला. तो चाकू त्याच्या छातीला लागला. त्यानंतर खिशात जबरदस्तीने हात घालून पाच हजार रुपये आणि मोबाईल फोन काढून घेऊन तो पळून गेला. यात शेख रोशन शेख चांद हा जखमी झाला.

## उमापूर येथे श्री क्षेत्र नारायण गडाचा ७४ वा नारळी सप्ताह उत्साहात; ह.भ.प.श्री.शिवाजी महाराजांची कीर्तन सेवा संपन्न

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी** – **उमापूर** येथे श्री क्षेत्र नारायणगड चा ७४ वा नारळी सप्ताह मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात संपन्न झाला. या सप्ताहानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून हरिनामाच्या गजरात सहभाग नोंदविला.

सप्ताहाच्या निमित्ताने हरिपाठ, भजन, प्रवचन आणि कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये श्री क्षेत्र नारायण गडांचे महंत




ह.भ.प.श्री शिवाजी महाराज यांच्या प्रभावी कीर्तन सेवेने उपस्थित भाविकांना मंत्रमुग्ध केले. त्यांच्या कीर्तनातून अध्यात्म, नैतिक मूल्ये आणि समाजप्रबोधनाचा संदेश देण्यात आला.

सप्ताहाच्या सांगता प्रसंगी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी ग्रामस्थ व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी नारायणगडाचे सर्व टाळकरी, वारकरी, गायक, वादक, चोपदार भजनी मंडळ तसेच सर्व भक्त परिवार व पंचक्रोशीतील महिला व पुरुष भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. या भव्य सप्ताहाच्या यशस्वीतेसाठी उमापुर ,मारोतीचीवाडी आणि पंचक्रोशीतील भक्तगण मंडळी परिश्रम घेत आहेत. सर्वांच्या एकीने हा भव्य उत्सव मोठ्या उत्साहात संपन्न झाला. याबद्दल ग्रामस्थांचे सर्वत्र स्तरातून कौतुक होत आहे. या नारळी सप्ताहामुळे उमापूर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून, सामाजिक ऐक्य व धार्मिक भावना अधिक दृढ झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

# सिल्लोडमध्ये श्री म्हसोबा महाराज यात्रेचा जल्लोषात प्रारंभ

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/ सिल्लोड:-** येथील ग्रामदैवत श्री म्हसोबा महाराज यांच्या वार्षिक यात्रा महोत्सवाला मंगळवारी (दि. ७) पारंपरिक शेंदूर टोप मिरवणूक आणि महाअभिषेकाने उत्साहात सुरुवात झाली. दुपारी १२:३० वाजता मिरवणुकीचे श्री म्हसोबा महाराज मंदिरात आगमन झाले, त्यानंतर भक्तीमय वातावरणात विधिवत महाअभिषेक सोहळा पार पडला.याप्रसंगी नगराध्यक्ष तथा श्री म्हसोबा महाराज यात्रा उत्सव समितीचे स्वागताध्यक्ष अब्दुल समीर अब्दुल सत्तार यांची प्रमुख उपस्थिती होती. संस्थानच्या वतीने त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी भाविकांशी संवाद साधताना अब्दुल समीर म्हणाले की, "यात्रा उत्सव ही आपली गौरवशाली



परंपरा असून ती जपणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे." यात्रा परिसरातील व्यावसायिकांशी संवाद साधताना त्यांनी स्वतः पारंपरिक डाळ्या-रेवड्यांची खरेदी करून या लोकपरंपरेचा आनंद लुटला.या सोहळ्याला उत्सव समितीचे अध्यक्ष सुदर्शन अग्रवाल, पदाधिकारी प्रताप प्रसाद, नंदकिशोर सहारे, किशोर अग्रवाल, विठ्ठल सपकाळ, अशोक बन्सोड, सुधाकर पाटील, राजेंद्र बन्सोड, शंकरराव खांडवे, दुर्गाबाई पवार, विशाल जाधव, मनोज कोठाळे, प्रशांत क्षीरसागर, मनोज झंवर, राजू गौर, शिवा टोम्पे, फहीम पठाण, विजय खाजेकर, जगन्नाथ कुदळ, गौरव सहारे, दीपक गायकवाड, दिलीप वाघ, सतीश सिरसाट, गणेश शेलार, गणेश डकले यांच्यासह मान्यवर व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वैभव चव्हाण यांच्या सेवापूर्ती निमित्त गौरव सोहळ्याचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**आष्टी प्रतिनिधी /बाळासाहेब रकटाटे** :हिवरा -पिंपरखेड (ता. आष्टी, जि. बीड) येथील गावचे सुपुत्र वैभव रघुनाथ चव्हाण यांनी भारतीय सैन्यात तब्बल २० वर्षे ३ महिने ३ दिवस देशसेवा बजावून आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे. त्यांच्या या गौरवशाली सेवेला मानाचा मुजरा देण्यासाठी गुरुवार, दि. ९ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता हिवरा -पिंपरखेड येथे सेवापूर्ती गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्याबद्दल परिसरात मोठा उत्साह निर्माण झाला आहे.

वैभव चव्हाण यांनी सन २००५ मध्ये भारतीय सैन्यात भरती झाले. चेन्नई येथे प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी २००७ ते २०१२ या कालावधीत जम्मू -काश्मीरमध्ये अत्यंत कठीण



परिस्थितीत सेवा बजावली. त्यानंतर २०१३ ते २०२० या आठ वर्षांच्या कालावधीत पुणे येथे एनडीआरएफ दलामध्ये कार्यरत राहून आपत्ती व्यवस्थापनाच्या अनेक मोहिमांमध्ये योगदान दिले. पुढे २०२१ ते २०२४ या काळात त्यांनी पुन्हा जम्मू-काश्मीरमध्ये सेवा बजावली. तसेच छत्तीसगडमधील नक्षलग्रस्त भागात एक वर्ष कार्य करून देशाच्या अंतर्गत सुरक्षेतही मोलाचा वाटा उचलला.

देशासाठी आपले तारुण्य अर्पण करणाऱ्या या कर्तृत्ववान जवानाच्या कार्याचा गौरव करण्यासाठी आयोजित करण्यात आलेला हा सोहळा विशेष ठरणार आहे. त्यांच्या कार्यामुळे हिवरा -पिंपरखेड गावाचे नाव उंचावले असून, ते आजच्या तरुणांसाठी प्रेरणास्थान बनले आहेत.

या कार्यक्रमानिमित्त धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले आहे. शहीद कांतीलाल गंगाधर शेळके यांच्या मातृपित्यांच्या शुभहस्ते श्री सत्यनारायण महापूजा आयोजित करण्यात आली असून, कार्यक्रमाला पावित्र्य लाभणार आहे. तसेच रामतीर्थ सालेवडगाव येथील स्वामी रामानंद पुरी महाराज यांचे मार्गदर्शनपर प्रवचन होणार असून, त्यांच्या विचारांमधून उपस्थितांना आध्यात्मिक प्रेरणा मिळणार आहे.

कार्यक्रमाचे ठिकाण हिवरा -पिंपरखेड असून, दुपारी १२ वाजल्यापासून भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. मोठ्या संख्येने ग्रामस्थ, नातेवाईक, मित्रपरिवार तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. वैभव चव्हाण यांच्या देशसेवेबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याची ही सुवर्णसंधी आहे.या सेवापूर्ती सोहळ्यास उपस्थित राहून सैनिकाचा सन्मान करावा व त्यांच्या पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा द्याव्यात, असे आवाहन समस्त चव्हाण परिवार व हिवरा पिंपरखेड ग्रामस्थांनी केले आहे.

# ग्रो कॅपिटल घोटाळाबाबत प्रसिद्धी माध्यमास बातम्या पुरवण्यामागे पुरस्कार प्राप्त शिक्षकांचा हेतू काय?

**दैनिक युवक आधार**

**दिग्रस तालुका प्रतिनिधी/उमेश साखरकर** : जादा परताव्याचे आमिष दाखवून कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी गाजत असलेल्या ग्रो कॅपिटल आर्थिक घोटाळ्यात अखेर मोठी कारवाई झाली आहे. या प्रकरणातील कथित मास्टरमाइंड म्हणून ओळखले जाणारे पुष्पांजली दिनेश रंधेरिया आणि मनोज अशोक पाटील उर्फ “बंटी-बबली” यांना अटक करण्यात पुसद पोलिसांना मोठे यश मिळाले आहे. या दोघांची न्यायालयात हजेरी लावल्यानंतर त्यांना पोलिस कोठडी सुनावण्यात आली असून या अटकेमुळे प्रकरणाच्या तपासाला नवे वळण मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे. याप्रकरणी दररोजच्या होणाऱ्या घडामोडी बाबत तालुक्यातील पुरस्कार प्राप्त एक जी.प शिक्षक प्रसिद्धी माध्यमास बातम्या पुरवत आहे. मात्र या प्रकरणी 'त्या' शिक्षकांचा अर्थाअर्थी काय संबंध? असा प्रसन्न उपस्थित होत आहे.

दिग्रस शहरात जादा परताव्याचे आमिष दाखवित सात जणांच्या टोळीने तब्बल ७ कोटी ४३ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला होता. शिक्षक, महिला तसेच सर्वसामान्य नागरिकांना लक्ष्य करून ही फसवणूक केल्याचा आरोप आहे. या प्रकरणात आधीच दिग्रस येथील केंद्रप्रमुख गिरीश दुधे, त्याचा भाऊ शिक्षक विनोदकुमार दुधे आणि गिरीश दुधेचा मुलगा मंदार दुधे यांना अटक झाली असून ते सध्या यवतमाळ

अशातच तालुक्यातील एका पुरस्कार प्राप्त शिक्षकाने आपले स्वतःचे दहा टक्के कमिशन पोटी इतर नागरिकांना गुतवणूक करण्याचा सल्ला दिल्याची चर्चा तालुक्यात होत असताना याच बाबत एका वृत्तपत्रामध्ये फसवणुकीमध्ये जि प शिक्षकांचा हातभार या मथळ्याखाली बातमी प्रकाशित केली असता 'त्या '

जी.प शिक्षकाने एका पत्रकाराविरुद्ध दिग्रस पोलीस स्टेशनला माझा या प्रकरणाशी कुठलाही संबंध नसून माझी मानहानी झाल्याबाबत तक्रार दाखल केली होती.पुढे पोलिसांनी त्या तक्रारीत तथ्य नसल्यामुळे एन सी दाखल केल्याचे समजते.

मात्र संबंधित प्रकरणाशी त्या पुरस्कार प्राप्त जि प शिक्षकांचा कुठलाही संबंध नसला तर दैनंदिन घडामोडी बाबत तो शिक्षक पत्रकारांच्या व्हाट्सअप वर संबंधित बातम्या पाठवीत असून अनेक पत्रकारांनी त्याचे स्क्रीन शॉट ही जपून ठेवले आहे. त्यामुळे प्रकरणातील आरोपी दुधे परिवाराशिवाय संबंधित जि.प शिक्षकाची चौकशी होणार का? असा प्रश्न सर्वसामान्य जनतेमधून उपस्थित होत आहे. आपल्या देशात महिलेचा आदर केला जातो.मान,मर्यादा दिला जातो. मात्र प्रकरण न्यायप्रविष्ठ असताना आरोपीवरील आरोप सिद्ध व्हायला काही वर्षे लागतील मात्र त्याच जीप शिक्षकाने अनेक पत्रकारांच्या व्हाट्सअप वर आरोपी असलेल्या महिलेचा फोटो पाठविले असल्यामुळे शिक्षकी पेशा असणाऱ्या त्या शिक्षकांचे हे कृत्य अशोभनीय असल्याची चर्चा सध्या तालुक्यात होत आहे. यामुळे निश्चितच या प्रकरणांमध्ये त्या पुरस्कार प्राप्त शिक्षकांचा हातभार असल्याचा संशयव्यक्त होत आहे.त्यामुळे पीडित कुटुंबातील काही व्यक्ती कडून संबंधित जी. प शिक्षकांची चौकशी करून सह आरोपी केल्यास बरेच घबाड बाहेर निघणार असल्याची बाब बोलून दाखविली आहे.

# अंकुर सिड्सच्या पुढाकारातून शेतकऱ्यांना आधुनिक शेतीचे मार्गदर्शन

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी/विजय काळे :** सोयगाव येथे अंकुर सिड्स प्रा. लि., नागपूर यांच्या वतीने आयोजित मका पिक पाहणी कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. गेल्या ५० वर्षांपासून शेतकऱ्यांच्या सेवेत कार्यरत असलेल्या संस्थेने या कार्यक्रमाच्या माध्यमातून संकरीत मका वाण “भास्कर” याबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.हा कार्यक्रम आदर्श शेतकरी राजू शिवाजी मालोदे यांच्या शेतात आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमास परिसरातील अनेक शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून मका पिकाची प्रत्यक्ष पाहणी केली व तज्ञांकडून पिक व्यवस्थापनाबाबत माहिती घेतली.या कार्यक्रमासाठी अंकुर सिड्सचे आरएसएम संभाजी दिंडे,टीएसएम गजानन चाठे, तसेच पाटील कृषी सेवा केंद्र,सोयगाव यांचे विशेष सहकार्य लाभले.केंद्राचे मालक किशोर पाटील तसेच त्यांचे सहकारी पिंटू चोपडे यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले.कार्यक्रम स्थळी उपस्थित शेतकऱ्यांसाठी वनभोजनाचीही व्यवस्था करण्यात आली होती, ज्यामुळे कार्यक्रमाला अधिक उत्साहाचे वातावरण



लाभले.

**पाटील कूषी केंद्राचे मालक किशोर पाटील यांची प्रतिक्रिया**

“अंकुर सिड्स प्रा.लि.यांच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेला हा मका पिक पाहणी कार्यक्रम शेतकऱ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरला.‘भास्कर’ या संकरीत मका वाणाची प्रत्यक्ष शेतात पाहणी केल्यामुळे शेतकऱ्यांचा विश्वास अधिक दृढ झाला आहे.आजच्या बदलत्या हवामानात आणि शेतीतील आव्हानांमध्ये आधुनिक वाण आणि योग्य मार्गदर्शनाची गरज आहे. या कार्यक्रमातून शेतकऱ्यांना पिक व्यवस्थापन,उत्पादन वाढ आणि खर्च कमी करण्याबाबत महत्त्वाची माहिती मिळाली.यापुढेही अशा प्रकारचे उपक्रम राबवून शेतकऱ्यांना नवीन तंत्रज्ञान व सुधारित बियाण्यांची माहिती देण्यासाठी आम्ही नेहमी प्रयत्नशील राहू.”

# इंस्टाग्रामवरील मैत्री पडली महागात , तरूणाची 15 लाखांची फसवणूक

**दैनिक युवक अध्क**

**पनवेल, (वार्ताहर) :** समाजमाध्यमावरील ओळखीचा गैरफायदा घेत एका 21 वर्षीय तरुणाची तब्बल 15 लाख रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार पनवेलमध्ये उघडकीस आला आहे. बनावट इंस्टाग्राम आयडीच्या माध्यमातून मैत्री करून आजारपणाचे कारण सांगत पैसे उकळल्याची माहिती समोर आली आहे.या प्रकरणी पनवेलमध्ये राहणाऱ्या 21 वर्षीय तरूणाने पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. गेल्या वर्षी 20 डिसेंबर ते 4 एप्रिल या कालावधीत एका बनावट इंस्टाग्राम आयडीद्वारे तरूणाशी संपर्क साधण्यात आला. संबंधित व्यक्तीने स्वतःला ‘साक्षी’ नावाची मुलगी असल्याचे भासवून तिच्या वडिलांच्या आजारपणासाठी आणि शस्त्रक्रियेसाठी पैशांची गरज असल्याचे सांगितले.यानंतर मोबाईलवरील व्हॉट्सॲपवरून ‘निखील माने’ नावाचा व्यक्त संपर्क साधत होता. त्याने स्वताची ओळख साक्षीच्या मैत्रिणीचा भाऊ असल्याचे सांगीतले होते. विश्वास संपादन केल्यानंतर आरोपींनी 21 वर्षीय तरूणाकडून टप्प्याटप्प्याने 14 लाख रुपये रोख आणि 1 लाख रुपये गुगल पेच्या माध्यमातून उकळले. या दरम्यान पिडित 21 वर्षीय तरूणाला सीवूड परिसरातील मॉलसमोर भेटण्यास बोलावले. तेथे आरोपीने त्याचा मोबाईल हिसकावून घेत आणखी पैशांची मागणी केली. पैसे न दिल्यास बलात्काराचा खोटा गुन्हा दाखल करण्याची तसेच कुटुंबीयांना जीवे मारण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता आणि माहिती तंत्रज्ञान कायद्यानुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन पोवार यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक अभय कदम अधिक तपास करत आहेत. समाजमाध्यमांवरील अनोळखी व्यक्तींशी संबंध ठेवताना सावधगिरी बाळगण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

# न्हावा गावदेवीची भव्य यात्रा मोठ्या भक्ती भावाने साजरी

## ३३ तास चाललेल्या पालखी सोहळ्यात ग्रामस्थांनी देवीचे शांततेत दर्शन घेत हजारो भाविकांनी यात्रेचा आनंद लुटला

**दैनिक युवक आधार**

**मुंबई (शांताराम गुडेकर) :** महाराष्ट्राला तिर्थक्षेत्रांची विशेष परंपरा लाभलेली आहे. या परंपरेनुसार विविध ठिकाणी जागृत देवस्थाने आहेत त्यापैकी जे. एन. पी. टी बंदर घारापुरी (एलिफंटा लेणी) यांच्यामधील न्हावा गावामधील मंदिर महाराष्ट्रात सुप्रसिद्ध आहे.

या गावामधील गावदेवीची यात्रा चैत्र कृष्ण पक्ष-१ दि.३ एप्रिल २०२६ पार पडला. तर पालखी सोहळा दि.४ एप्रिल २०२६ रोजी मोठया थाटामाटात पार पडला.अनेक गावामधील ग्रामस्थांनी देवीचे शांततेत दर्शन घेतले व हजारो भाविकांनी यात्रेचा आनंद लुटला .पालखी सोहळा यावर्षी ३३ तास चालला होता.ग्रामस्थांनी जत्रेची विशेष तयारी केली होती.तसेच हा संपूर्ण सोहळा यशस्वी करण्यासाठी ग्रामसुधारक मंडळ न्हावे कमिटीचे





अध्यक्ष राजेश काळूराम घरत,उपाध्यक्ष जयेंद्र जनार्दन पाटील,नितीन भरत भोईर, सतीष दत्ताराम भोईर,सुशांत बांद्रे,खजिनदार निलेश हरिश्चंद्र भोईर,सहखजिनदार अनंत लहु म्हात्रे,चेतन लक्ष्मण कडू,समाधान सदानंद म्हात्रे ,सरपंच विजेद्र गणेश पाटील,उपसरपंच शैलेश विठ्ठल पाटील आणि हिरालाल हरी पाटील , सुहास पाटील,जयवंत पाटील मनीष गणेश भोईर अशोक दामू भोईर, गणेश भोईर तसेच मंडळ सदस्य, सभासद तसेच संबंधित अन्य पदाधिकाऱ्यांनी यांनी विशेष मेहनत घेतली.

पालखी सोहळ्यांसाठी मुंबई, ठाणे व पनवेल तसेच उरण तालुक्यातील आगरी-कोळी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहीले होते. गावदेवीचे देऊळ गावकऱ्यांच्या सहभागाने बांधण्यात आले आहे. ही देवी नवसाला पावते म्हणून महाराष्ट्र व परराज्यातूनही अनेक भाविक येथे दर्शनाला येतात. गावदेवीची प्रसन्न व लोभसवाने रुप प्रत्येक भक्ताने एकदा तरी डोळे भरून पाहावे .सर्व भक्तांनी आरोग्य,सुख,शांती प्रदान करण्याची विनंती देवीला केली असे सदर गावचे सुपुत्र अशोक दामू भोईर यांनी बोलताना सांगितले.

# धामणीतील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचा संताप उसळला

## रोजगार न देणाऱ्या कंपनीविरोधात चौकशीची मागणी तीव्र; साबळे-पिंगळे परिवाराचा उपोषणाचा इशारा

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी (साबीर शेख) :** ता. खालापूर येथील मौजे धामणी (ग्रुप ग्रामपंचायत कुंभिवली) परिसरातील प्रकल्पग्रस्त शेतकरी व ग्रामस्थांचा रोजगारासाठीचा संघर्ष आता टोकाला पोहोचला आहे. सुमारे ३० ते ३५ वर्षांपूर्वी स्थानिकांना रोजगार मिळावा या अपेक्षेने शेतकऱ्यांनी आपली जमीन कवडीमोल भावात कंपनीला विकली होती. मात्र, आजतागायत त्या ठिकाणी कोणताही ठोस प्रकल्प उभारला गेला नसल्याने भूमिहीन झालेल्या शेतकऱ्यांवर आर्थिक संकट कोसळले आहे.

सदर जागा पुढे आशापुरा फुड्स



प्रा. लि. या कंपनीकडे हस्तांतरित करण्यात आली. मात्र, स्थानिकांना रोजगार देण्याचे आश्वासन पूर्ण न करता बाहेरील ठेकेदारांना प्राधान्य दिले जात असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. त्यामुळे प्रकल्पग्रस्त युवक-युवती रोजगारापासून वंचित राहिले असून त्यांच्या उपजीविकेचा प्रश्न अधिक गंभीर बनला आहे.

याशिवाय, स्थानिकांवर दबाव आणण्यासाठी काही राजकीय मंडळींना हाताशी धरून प्रकल्पग्रस्त कुटुंबांवर कायदेशीर कारवाई करण्याचा प्रयत्न होत असल्याचा गंभीर आरोपही करण्यात आला आहे. या संदर्भात पिंगळे व साबळे कुटुंबीयांनी पोलीस स्टेशन, ग्रामपंचायत, पंचायत समिती तसेच तहसीलदार कार्यालयात निवेदने दिली आहेत. अनेक बैठका होऊनही वर्ष उलटून गेले, तरी कोणतीही ठोस निर्णय न झाल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

“प्रकल्पग्रस्तांना रोजगार न देणे, नियमबाह्य पद्धतीने कंपनी चालवणे आणि आम्हालाच गुन्हेगार ठरवण्याचा प्रयत्न हा अन्यायकारक आहे. आम्ही लोकशाही मार्गाने लढा देणार असून गरज पडल्यास उपोषण करू,” असा इशारा तानाजी पिंगळे व साबळे बंधूंनी दिला.

ही लढाई केवळ रोजगारासाठी नसून हक्क आणि न्यायासाठी असल्याचे ग्रामस्थांनी स्पष्ट केले असून, आता या प्रकरणात कंपनी आणि प्रशासन कोणती भूमिका घेणार याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.याबाबतीत अधिक माहिती साठी कंपनी व्यवस्थापनाशी संपर्क साधला असता तो झाला नाही.पोलीस प्रशासनाने कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण न व्हावा यासाठी सूचना केलेली पहायला मिळाली.

# भरदिवसा पाठलाग करून व्यापाऱ्याची सोनसाखळी हिसकावली

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** कळंबोलीतील स्टील मार्केट परिसरात भरदिवसा थरारक प्रकार घडला असून, दुचाकीवरून जाणाऱ्या व्यापाऱ्याचा पाठलाग करत चोरट्यांनी तीन लाख रुपयांची सोनसाखळी हिसकावल्याची घटना उघडकीस आली. या प्रकारामुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.कळंबोलीतील 55 वर्षीय व्यापारी हे त्यांच्या स्टील मार्केटमधील गोदामावरून दुचाकीने तळोजा येथे गेले होते. तळोजातून परत येत असताना दोन युवक त्यांच्या दुचाकीचा पाठलाग करत असल्याची त्यांना जाणीव झाली. स्टील मार्केटमधील गोदाम क्रमांक 1640 समोरील रस्त्यावर त्यांच्या दुचाकीचा वेग कमी होताच, पाठलाग करणाऱ्या चोरट्यांपैकी मागे बसलेल्या युवकाने त्यांच्या गळ्यातील सुमारे तीन लाख रुपयांची सोनसाखळी हिसकावली. या झटापटीत व्यापाऱ्याच्या मानेस दुखापत झाली. त्यानंतर त्यांनी तातडीने पोलीस ठाणे गाठले. पोलीस उपनिरीक्षक सतीश नवले यांनी घटनेची नोंद करून जखमी व्यापाऱ्याला उपचारासाठी पनवेल शहरातील नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालयात पाठवले. या घटनेनंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कोते यांनी सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे संशयितांचा माग काढण्यासाठी पथक नेमले आहे. यापूर्वी सोनसाखळी चोरीच्या घटना प्रामुख्याने महिलांना लक्ष्य करून घडत होत्या. मात्र, आता दागिने घालणाऱ्या पुरुषांनाही लक्ष्य केले जात असल्याने नागरिकांमध्ये चिंता वाढली आहे. नवी मुंबई परिसरात वाढत्या रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण आणण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.